संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा
रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. १६.१०.२०२६ | अंक नं. १६८ | वर्ष ६१ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

दिवाळी महासेल.. शनिवार दि.१७ ते रविवार दि.१८/१०/२०२६ फक्त दोनच दिवस..
महिलांसाठी : साडी, कुर्ती, लेगीन्स, वन पीस, वेस्टर्न वन पीस, ब्लाऊज भारी, टॉप, ट्राऊजर, कोरियन,खादी व कॉटन पॅण्ट, नाईट पॅण्ट प्लाझो.. रु.२००/-ला काहीही १ व रु.५०० ला ३
पुरुषांसाठी : शर्ट, टी-शर्टस, नाईट पॅण्ट,ट्राउजर, जीन्स २०० रु.काहीही १ व ५०० ला ३
लेडीज : स्मॉल टू 2XL टू पीस, कॉर्ड सेट, नाईट ड्रेस रु.२५०/-
टू पीस 3XL ते 6xL रु.३००/-
* लहान मुला-मुलींचे ड्रेस रु. २०० पासून पुढे
* लहान व मोठ्या मुलींचे भारी पार्टी वेअर ड्रेस व मुलांचे भारी कुर्ता+पायजमा रु.३००/-पासून पुढे
* बेडशीट+पिलो कव्हर
100 x 100 चे ८०० चे रु.४००/-
108 x 108 चे रु.१२०० चे रु.५००/-
वेळ : दुपारी १२ रात्री ८ वाजेपर्यंत
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूलजवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

यंदाची सुवर्णखरेदी, भरघोस फायद्याची..
दिवाळी धमाका ऑफर
₹999/- प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांवी) + ₹111/- चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)
सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनद्वारे 11 एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी* (प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)
ऑफर कालावधी - 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
Conditions Apply*

कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

सातवे पुण्यस्मरण
सुर्य जरी डोंगराआड गेला
तरी संधिप्रकाश रेंगाळतो
सहवास जरी संपला
तरी आठवणींचा सुगंध दरवळतो

स्व. ज्ञानदेव (नाना) रावसाहेब रासकर
स्व.दि.१७/१०/२०१९
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली..
: दुःखांकित :
* हॉटेल पर्वत - लॉजिंग अॅण्ड परमिट रुम, सहकार सभागृहामागे, अ.नगर.
* हॉटेल राऊ - लॉजिंग, बियर शॉपी अॅण्ड चायनीज सेंटर, महात्मा फुले चौक, अ.नगर.
* हॉटेल कोमल चायनीज - आनंदधाम चौक, अ.नगर
समस्त रासकर परिवार

# वीजपुरवठा वारंवार होतोयं खंडित

## वातावरणातील उकाडा व ऐन सणासुदीच्या तोंडावर वीज नसल्याने नागरिकांमध्ये संताप, व्यापारी व उद्योजकांनाही फटका

नगर - नगर शहरातील विविध भागांत वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नगरकर हैराण झाले आहेत. वातावरणातील उकाडा अन् ऐन सणासुदीच्या तोंडावर वीज नसल्याने नागरिकांचा संताप होत आहे. या खंडित वीजपुरवठ्याचा उद्योजकांनाही मोठा फटका बसत आहे. वीज वितरण प्रशासनाकडून जुजबी उत्तर देण्याच्या पलीकडे कोणतीही कार्यवाही होताना दिसत नाही.

केडगाव येथील महावितरणच्या उपकेंद्रात उच्च विद्युत तारांमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे शहरातील निम्म्या भागाचा तसेच औद्योगिक क्षेत्रात गेल्या काही महिन्यांपासून विद्युत पुरवठा खंडित होत आहे. यामुळे छोट्या-मोठ्या व्यावसायिकांचे नुकसान होते. याबाबत मागील आठवड्यात महावितरण प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी उद्योजकांच्या असोसिएशन ऑफ अहमदनगर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज आमी संघटनेच्या वतीने महावितरणच्या कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. गेल्या सहा ते सात महिन्यांपासून हा प्रकार घडत असल्याने उद्योजकांनी नाराजी व्यक्त केली होती. नियमीत वीज नसल्याने उद्योजकांना मालाचे उत्पादन वेळेत करता येत नाही व पुढे ग्राहकांना वेळेत माल पोहचत नसल्याने याची मोठी आर्थिक झळ बसत आहे.

शहरात सतत वीजपुरवठा खंडित होत असल्याने नगरकरांना ऑक्टोबर हिटच्या झळाही मोठ्या प्रमाणात बसत आहेत. अनेक विद्युत उपकरणांचेही यामुळे नुकसान होत आहे. त्यातच सध्या नवरात्र उत्सव सुरु असून लवकरच दसरा व दिवाळी या महत्वाच्या सणांना प्रारंभ होत आहे. या पार्श्वभूमीवर वीजपुरवठा सुरळीत होणार नसेल तर मग सरकार काय कामाचे? असा सवाल नगरकर करत आहेत.

### ग्रामीण भागालाही झळा

वारंवार होणाऱ्या खंडित वीजपुरवठ्याचा शहराबरोबरच ग्रामीण भागालाही मोठा फ टका बसत आहे. पावसाने पाठ फि रवल्याने आधीच हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना वीज वेळेवर उपलब्ध होत नसल्याने शेतातील पीके जगवायची कशी? हे संकट समोर उभे आहे. विहीरीमध्ये जे पाणी उपलब्ध आहे ते वीज नसल्याने पिकांना देता येत नाही, त्यामुळे शेतकरी वैतागला आहे.

SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

THE RESPONSIBLE JEWELLER
अधिक मोठी जागा, अधिक उत्तम अनुभव आता अहिल्यानगर मध्ये!
भव्य उद्घाटन
17 ऑक्टोबर 2026
प्रार्थना बेहेरे (अभिनेत्री) यांच्या हस्ते उद्घाटन
— उद्घाटना निमित्त विशेष ऑफर्स —

मलाबार प्रॉमिसेस
मलाबार गोल्ड & डायमंड्स
माऊली संकुलाच्या समोर, नगर - मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
0241 6615916, 09562 916 916
BUY ONLINE AT: malabargoldanddiamonds.com | 14 देशांमध्ये 450 हून अधिक शोरूम्स

TVS
Since 1992
Shivam TVS
सर्वोत्तम 125CC गाडी म्हणजे
TVS THE ALL-NEW Jupiter 125
पॉवरफुल इंजिनसह मिळवा कम्फर्ट आणि जबरदस्त मायलेज!
व्याजदर 5.99%* | डाऊन पेमेंट* फक्त ₹4999 | ₹10000* पर्यंत डिस्काउंट | EMI ₹99* प्रतिदिन
मिळवा बुकिंगवर हमखास रु.4200 किंमतीची भेटवस्तू

मोठी बूट स्पेस
फ्रंट फ्युएल फील
दोन्ही १२ इंची अलॉय व्हील्स
ऑटो स्टार्ट-स्टॉप स्विच
या फेस्टिव्ह सिझन मध्ये करा नव्या राईडचा शुभारंभ!
नगरमध्ये सर्वात कमी किमतीची हमी!
कोणतीही गाडी घेण्यापूर्वी शिवम TVS ला नक्की भेट द्या.
पत्ता: शिवम TVS, झोपडी कॅन्टीन समोर, सावेडी, अहिल्यानगर
91300 30003 | 77966 85500
*T & C Apply

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# महावितरणच्या वाढीव वीजबिलांचा नागरिकांना शॉक

## स्मार्ट मीटर, चुकीचे रीडिंग आणि वेळेवर बिल न मिळण्याच्या तक्रारी; वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उत्तरांवरही ग्राहकांचे समाधान नाही

नगर – महावितरणकडून येणाऱ्या अव्वाच्या सव्वा वीजबिलांमुळे नागरिक हैराण झाले असून, वीजबिलांबाबतच्या तक्रारींचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वाढीव वीजबिले, मीटर रीडिंगमधील चुका, वेळेवर बिल न मिळणे आणि तक्रारी करूनही समाधानकारक उत्तर मिळत नसल्याने वीजग्राहकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. त्यातच स्मार्ट मीटर बसवल्यानंतर वीजबिलात वाढ झाल्याचा दावा अनेक ग्राहकांकडून केला जात असल्याने महावितरणच्या बिलिंग प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.





स्मार्ट मीटर बसवल्यानंतर वीजबिलाच्या रकमेत वाढ झाल्याचे काही ग्राहकांचे म्हणणे आहे. पूर्वीच्या वीजवापराच्या तुलनेत आता अधिक बिल येत असल्याची तक्रार ग्राहकांकडून केली जात आहे. स्मार्ट मीटरमुळेच बिल वाढले आहे का, की त्यामागे अन्य तांत्रिक किंवा वापराशी संबंधित कारणे आहेत, याबाबत महावितरणने ग्राहकांना स्पष्ट माहिती देण्याची गरज व्यक्त होत आहे.

वीजमीटरचे रीडिंग घेण्याची जबाबदारी असलेल्या एजन्सीकडून रीडिंग घेताना चुका होत असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. प्रत्यक्ष वीजवापर आणि बिलावर नमूद केलेला वापर यामध्ये तफावत असल्यास ग्राहकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. रीडिंगमधील चुका वेळेत दुरुस्त करून ग्राहकांना योग्य बिल देण्याची जबाबदारी महावितरणने पार पाडावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

अनेक ग्राहकांना वीजबिले वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. बिल उशिरा मिळाल्याने भरण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. परिणामी, विलंब शुल्क किंवा इतर अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे वीजबिल वितरणाची प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि वेळेत होणे आवश्यक आहे.

### तक्रारींचे निवारण कधी होणार?

वाढीव वीजबिलांबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्यानंतरही समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याची भावना काही ग्राहकांकडून व्यक्त होत आहे. ग्राहकांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन त्यांचे तांत्रिक तपासणीद्वारे निराकरण करण्याऐवजी केवळ उत्तरे दिली जात असल्याचा आरोप ग्राहकांकडून केला जात आहे.

वीजबिलांमधील संभाव्य चुका दुरुस्त करणे, स्मार्ट मीटरबाबतच्या शंकांचे निरसन करणे, रीडिंग घेणाऱ्या एजन्सीच्या कामकाजावर देखरेख ठेवणे आणि तक्रारींचे वेळेत निवारण करणे, या बाबींवर महावितरणने लक्ष देण्याची गरज आहे. ग्राहकांना योग्य वीजबिल आणि पारदर्शक सेवा मिळावी, यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वीजग्राहकांकडून होत आहे.

## नागापूर चौक परिसरातून मोटरसायकलची चोरी

नगर – शहरातील नागापूर चौक परिसरातून एकाची हिरो स्प्लेंडर प्लस मोटरसायकल (एमएच १६ ए एन ६७८०) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत नितीन बाबासाहेब शेलार (वय ३२, रा. निंबळक बायपास, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. नागपूर चौक परिसरातून त्यांची मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# फ्लॅट ताबा देण्यास बिल्डरकडून टाळाटाळ, नैराश्यातून आत्महत्या

नगर – बुक केलेल्या फ्लॅटचा ताबा देण्यास बिल्डरने वारंवार टाळाटाळ केल्याने घराचे स्वप्न अधुरे राहिल्याने आलेल्या नैराश्यातून एका ४९ वर्षीय व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. आत्महत्येपूर्वी लिहून ठेवलेल्या सुसाईड नोटच्या आधारे भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात बिल्डरविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आनंद खिराजी धिवर (वय ४९, रा. वैद्य कॉलनी, जामखेड रोड, अहिल्यानगर) असे आत्महत्या करणाऱ्या दुर्दैवी व्यक्तीचे नाव आहे.

या प्रकरणी त्यांचे पुत्र प्रथमेश आनंदा धिवर (वय २९) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारीनुसार, मयत आनंद धिवर आणि त्यांच्या कुटुंबीयांनी आरोपी बिल्डर तबरेज अकबर शेख (रा. डावरे गल्ली, मुंजोबा मंदिराशेजारी, अहिल्यानगर) याच्याकडून टू बीएचके फ्लॅट बुक केला होता. परंतु, आरोपी बिल्डर त्यांना ठरल्याप्रमाणे टू बीएचके फ्लॅट न देता वन बीएचके फ्लॅट देतो असे म्हणून टाळाटाळ करत होता.

या कारणावरून फिर्यादी आणि त्यांच्या वडिलांनी आम्हाला टू बीएचके फ्लॅटच पाहिजे असे सांगितले असता, आरोपी बिल्डरने त्यांना वारंवार शिवीगाळ आणि दमदाटी केली. तसेच कर्जाची फाईल पुढे न पाठविल्यामुळे मयताच्या मनात प्रचंड नैराश्य आले होते. आपले हक्काचे घर घेण्याचे स्वप्न अपुरे राहिल्याने आणि बिल्डरने आपली फसवणूक केल्याच्या भावनेतून मयत आनंद धिवर यांनी चिंतेत सुसाईड नोट लिहून आपल्या राहत्या घरी गळफास घेत जीवन संपवले. या प्रकरणी मयताचे पुत्र प्रथमेश धिवर यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी १५ ऑक्टोबर रोजी आरोपी तबरेज अकबर शेख याच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात व त्यांचे पथक करत आहे.

# शहरातील पथदिवे तातडीने सुरु करा

## उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करा: उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांचे निर्देश

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या मार्केट, विद्युत, घनकचरा व्यवस्थापन आणि प्रकल्प विभागाची महत्त्वाची आढावा बैठक उपमहापौर कार्यालयात पार पडली. उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत शहरातील विविध नागरी समस्या, मूलभूत सुविधा, प्रलंबित कामे आणि नागरिकांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यात प्रामुख्याने शहरातील बंद पथदिवे तातडीने सुरु करावेत आणि उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले.



बैठकीदरम्यान मार्केट आणि प्रकल्प विभागाकडून शहरातील मुख्य भागात विकसित होत असलेल्या विविध व्यापारी संकुल व भाजीमंड्यांच्या कामांचा आढावा घेण्यात आला. ॲड. जाधव यांनी प्रोफेसर कॉलनी चौक व्यापारी संकुल, सर्जेपुरा रंगभवन व्यापारी संकुल, नगर–मनमाड रोड एन.सी.सी. ऑफिस व्यापारी संकुल, गंजबाजार भाजीमंडई व व्यापारी संकुल, नेहरू मार्केट भाजीमंडई व व्यापारी संकुल तसेच सर्जेपुरा चौक येथील प्रियदर्शनी शॉपिंग कॉम्प्लेक्स या निर्माणाधीन प्रकल्पांविषयी मार्केट विभाग प्रमुख अशोक साबळे आणि प्रकल्प विभागाचे उपअभियंता राजेंद्र मेहेत्रे यांच्याकडून सविस्तर माहिती घेतली. प्रकल्पांसमोरील अडचणी लवकरच पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन दूर केल्या जातील आणि प्रत्यक्ष कामास सुरुवात केली जाईल, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

### बंद पथदिवे तातडीने सुरू करण्याचे निर्देश

तसेच विद्युत विभागाच्या आढाव्यात शहर व उपनगरातील बंद असलेल्या पथदिव्यांचा प्रश्न गांभीर्याने चर्चिला गेला. रात्रीच्या वेळी अंधारामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होणे, चोऱ्यांच्या घटना घडण्याची शक्यता आणि वाहनचालकांना अपघातांचा धोका टाळण्यासाठी महानगरपालिका हद्दीतील बंद पथदिवे तातडीने सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. प्रत्येक वायरमनने संबंधित मनपा सदस्यांची भेट घेऊन प्रभागातील समस्या सोडवाव्यात आणि काही भागांत सर्व्हिस वायर न ओढता कंडक्टरवर लाईन टाकण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### नियमांचे उल्लंघन करून कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचे निर्देश

घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या आढाव्यात शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी करणे, ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करणे आणि जीव्हीपी स्पॉटवरील कचऱ्याची समस्या दूर करण्याबाबत चर्चा झाली. नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी किंवा मोकळ्या जागेत कचरा टाकणे टाळावे व मनपाच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन ड. धनंजय जाधव यांनी केले. तसेच नियमांचे उल्लंघन करून कचरा टाकत असलेल्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले.

या बैठकीला नगरसेवक दत्ता गाडळकर, मोहित पंजाबी, गणेश गाडळकर यांच्यासह सहाय्यक आयुक्त तथा मार्केट विभाग प्रमुख अशोक साबळे, उपअभियंता राजेंद्र मेहेत्रे, घनकचरा विभाग प्रमुख प्रशांत रामदिन, इलेक्ट्रीक विभाग प्रमुख क्षेत्रे, उपअभियंता साळी, ठोंबे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## आयशर टेम्पोची मोपेडला धडक, दोघे जखमी; चालक घटनास्थळी वाहन सोडून झाला पसार

नगर – नगर ते कल्याण जाणारे हायवेरोडवर निमगाव फाटा येथे आयशर टेम्पोने मोपेडला दिलेल्या जोरदार धडकेत दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. अपघात घडल्यानंतर आरोपी चालक आपली गाडी घटनास्थळीच सोडून पसार झाला असून, याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १४ ऑक्टोबर रोजी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. फिर्यादी अक्षय काशिनाथ सोनवणे (वय २९ वर्षे, धंदा– शेती, रा. कुरणमळा, हिंगणगाव, ता. नगर) यांचे भाऊ अमोल काशिनाथ सोनवणे आणि अभिजित पोपट सोनवणे हे दोघे त्यांची ॲक्टिवा मोपेडवरून (क्र. एमएच १६ डीजे ०४०९) जात असताना, पाठीमागून येणाऱ्या आयशर टेम्पोच्या (क्र. एमएच२२शएन३५४८) चालकाने त्यांना जोरदार धडक दिली.

या भीषण अपघातात अमोल आणि अभिजित हे दोघे जखमी झाले असून, त्यांच्या मोपेडचे ही मोठे नुकसान झाले आहे. अपघात केल्यानंतर चालकाने जखमींना कोणतीही मदत न करता किंवा उपचारासाठी न नेता वाहन तिथेच सोडून तिथून पळ काढला. याप्रकरणी १५ ऑक्टोबर रोजी नगर तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता चे कलम २८१, १२५(अ),(ब), ३२४(४) सह मोटर वाहन कायदा १८४, १३४(अ),(ब), १३७ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## मधुकर देशपांडे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – केडगाव येथील सेवानिवृत्त ग्रामसेवक आणि केडगाव पेन्शनर्स असोसिएशनचे माजी सचिव मधुकर दिनकर देशपांडे (वय ९४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. १५ ऑक्टोबर रोजी त्यांच्या पार्थिवावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, नात सुना, पणतू असा परिवार आहे. नगर न्यायालयातील निवृत्त नाझर चंद्रकांत देशपांडे आणि पत्रकार रवींद्र देशपांडे यांचे ते वडील होते.

## श्रीमती जनाबाई पाखरे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – नागरदेवळे येथील जनाबाई विठ्ठल पाखरे (वय ७२) यांचे १५ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नागरदेवळे अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. माजी सैनिक स्व. विठ्ठल पाखरे यांच्या पत्नी तर कु. प्रिती व ज्योती आल्हाट यांच्या त्या मातोश्री होत.

## वसंतलाल गांधी यांचे अल्प आजाराने निधन



नगर – पारगाव सुद्रिक येथील रहिवासी वसंतलाल कुंदनमल गांधी (पारगाववाला) (वय ७०) यांचे १६ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पारगाव सुद्रिक येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. महावीर, वर्धमान व रचना यांचे ते वडील, ताराचंद गांधी यांचे धाकटे बंधू तर केवल, वालचंद, आदेश, राजेश, संदेश यांचे काका होत.

## उद्योजक गुलशन कंत्रोड यांचे निधन



नगर – उद्योजक व गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान आणि घर घर लंगर सेवेचे सेवादार गुलशन बिकमदास कंत्रोड (वय ७२) यांचे ११ ऑक्टोबर रोजी निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुली, जावई, नातवंडे, १ बहीण असा परिवार आहे. माजी नगरसेवक राजेंद्र कंत्रोड यांचे ते बंधू होत. घर घर लंगर सेवेच्या माध्यमातून गुलशन कंत्रोड गेल्या पाच वर्षांपासून दर महिन्याला नियमितपणे गुप्त सेवा देत होते. सायकल वाटप, शालेय साहित्य किट, राष्ट्रीय एकात्मता युवा शिबिर, महाराष्ट्र व पंजाबमधील पूरग्रस्तांना मदत आणि जनावरांसाठी चारा अशा विविध उपक्रमांमध्येही त्यांचे योगदान होते.

मनमिळावू स्वभाव व परखड भाष्याने ते सर्वांना सुपरिचित होते. भाई कुंदनलालजी गुरुद्वारामध्येही त्यांचा सक्रिय सहभाग होता. अन्न छत्रालयात ते दररोज सायंकाळी ५ ते ७ या वेळेत जेवणाच्या पाकिटाचे वितरण करत असत.

# नगर-दौंड रोडवर दरोड्याच्या तयारीत असणारी टोळी पकडली

## कोयता, मिरची पावडर, मोबाईल व इतर साहित्यासह दोन जण जेरबंद, ३ जण फरार

नगर – नगर ते दौंड हायवेवरील हिवरेझरे (ता.नगर) शिवारात दरोडा टाकण्याच्या तयारीत बसलेल्या एका सराईत टोळीवर नगर तालुका पोलीस ठाण्याच्या पथकाने कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून कोयता, मिरची पावडर, मोबाईल व इतर साहित्यासह ३० हजार ६२४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तर तीन आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले आहेत. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ ऑक्टोबर रोजी रात्री ११:३५ वाजेपासून ते १५ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे ४:०२ वाजेच्या सुमारास नगर ते दौंड जाणारे हायवे रोडलगत, शिवनेरी मंगल कार्यालयजवळ, हिवरेझरे (ता. नगर) येथे ही घटना घडली. या परिसरातील एका मोठ्या आकाराच्या वडाच्या झाडाच्या खोडाच्या आडोशाला अंधारात काही इसम दरोडा टाकण्याच्या उद्देशाने दबा धरून बसले होते.

पोलिसांनी मायाभाई उर्फ लक्ष्मण अशोक वाघ (वय २८, रा. शिराढोण, ता. नगर) आणि लाडू उर्फ अमोल दत्तात्रय कासार (वय २६, रा. गुंडेगाव, ता. नगर) या दोन आरोपींना पकडले आहे. तसेच त्यांच्यासोबत असलेले पप्पु उर्फ आदिनाथ शरद पवार (रा. चिखली कोरेगाव, ता. श्रीगोंदा), भाई उर्फ दिपक मुरलीधर घायमुक्ते (रा. देऊळगाव सिद्धी, ता. नगर) आणि ५) एक अनोळखी इसम हे तीन आरोपी फरार झाले आहेत.

आरोपींनी दरोडा टाकण्याच्या उद्देशाने लोखंडी कोयता, कापडी मास्क, लोखंडी पाईप, मिरची पावडर, एक विवो मोबाईल आणि एक रेडमी मोबाईल असा एकूण ३०,६२४ रुपये किमतीचा मुद्देमाल स्वतः च्या कब्जात बाळगला होता. या सर्व साहित्यासह पोलिसांनी आरोपींना जेरबंद केले आहे. याप्रकरणी त्यांच्या विरुद्ध पो.कॉ.सागर मिसाळ (वय ३६, नेमणूक– नगर तालुका पोलीस स्टेशन) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम ३१० (४) प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ही कारवाई नगर तालुका पोलीस ठाण्याचे स.पो.नि. गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, तपास पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे करत आहेत.

# भुईकोट किल्ल्याच्या जॉगिंग ट्रॅकवर फिरायला येणाऱ्यांना मधमाशांनी घेतला चावा

### दोन नागरिक जखमी

नगर – भुईकोट किल्ला परिसरात शुक्रवारी सकाळी व्यायाम करण्यासाठी व फिरण्यासाठी आलेल्या काही नागरिकांना नगर क्लब समोरील भागात अचानक मधमाशांनी चावा घेतला. यात दोन जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. काही नागरिकांनी तेथुन पळ काढला तर काहींनी जमिनीवर झोपून घेतले. सुमारे पंधरा मिनिटे माशांचे घोंगावणे सुरु होते. सध्या या परिसरात सुशोभीकरण अंतर्गत काम सुरू असून नागरिकांनी या ठिकाणी वावरताना काळजी घ्यावी असे आवाहन निसर्ग मित्र मंदार साबळे यांनी केले आहे.



भुईकोट किल्ला परिसरात शुक्रवारी सकाळी व्यायाम करण्यासाठी व फिरण्यासाठी आलेल्या काही नागरिकांना नगर क्लब समोरील भागात अचानक मधमाशांनी चावा घेतला.

कोठेही असताना असा प्रकार झाल्यास जवळ सुरक्षित जागा शोधा अथवा जवळच्या कारचा आश्रय घ्या. जवळ कापड, रुमाल असल्यास धावताना आपले तोंड, डोळे आणि मान कपड्याने किंवा हाताने पूर्णपणे झाकून घ्या, कारण या संवेदनशील भागांवर मधमाश्या जास्त हल्ला करतात. माशांना मारण्याचा किंवा हाताने उडवण्याचा प्रयत्न केल्यास त्या अधिक आक्रमक होतात. अनेक जण माशांपासून वाचण्यासाठी पाण्यात उडी मारतात, पण मधमाश्या तुम्ही बाहेर येईपर्यंत पाण्याच्या वरच घोंगावत थांबण्याची शक्यता असते.

दंश झालेल्या भागात तिचा काटा त्वचेमध्येच राहतो. तो हळुवार काढा. जागा स्वच्छ धुवून त्यावर बर्फ उपलब्ध झाल्यास बर्फाचा शेक द्या तसेच तात्काळ डॉक्टरांचा सल्ला व उपचार घ्यावेत असेही साबळे यांनी सांगितले.

# २२ गंभीर गुन्हे असलेल्या एमआयडीसीतील भाकरे टोळीवर संघटीत गुन्हेगारीचे कलम

नगर – एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोडा घालण्याच्या तयारीत असलेल्या भाकरे टोळीविरूध्द पोलिसांनी संघटित गुन्हेगारीच्या कलमान्वये कारवाई केली आहे. या टोळीतील प्रेम नरेंद्र भाकरे, यश सुनील घाग आणि विशाल भाऊसाहेब पाटोळे या तिघांना यापूर्वीच अटक करण्यात आली असून, त्यांचे दोन साथीदार पसार आहेत. या टोळीतील सदस्यांविरूध्द जबरी चोरी, खुनाचा प्रयत्न आणि जबरी मारहाण यांसारखे एकूण २२ गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

२८ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री अकराच्या सुमारास अहिल्यानगर–मनमाड महामार्गावरील बोल्हेगाव फाट्याजवळील आराध्या पेट्रोलपंपाच्या पाठीमागे, हॉटेल बजरंगच्या बाजूला काही जण दरोडा घालण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार एमआयडीसी पोलिसांनी या ठिकाणी छापा टाकला. तिघांना पकडले तर त्यांचे साथीदार अभिषेक ऊर्फ भोर्या अरविंद भिंगारदिवे आणि संग्राम सोन्याबापू कदम हे पळून गेले. पोलिसांनी केलेल्या कारवाईत गावठी कट्टा, जिवंत काडतूस आणि लाल मिरचीची पूड यांसारखे साहित्य आढळून आले.

या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. संबंधित आरोपींविरूध्द गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याने एमआयडीसी पोलिसांनी संबंधित गुन्ह्यात भारतीय न्याय संहितेचे कलम १११ वाढीव स्वरूपात लागू करण्यासाठी अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित गुन्ह्यात कलम १११ वाढविण्यात आले आहे. स.पो.नि. हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली अंमलदार राकेश खेडकर, शैलेश रोहोकले, राजु सुद्रीक, दीपक फुंदे, नवनाथ दहिफळे आदींचा पथकाने या कारवाईत मदत केली.









नवरात्री उत्सवाच्या निमित्ताने अहिल्यानगर – छत्रपती संभाजीनगर रोडवरील जेऊर जवळील नारायण महाराज आश्रमात कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिराची प्रतिकृती तयार करण्यात आली. दर्शनासाठी भाविक दिवसभर गर्दी करीत आहेत. (छायाचित्र – विजय मते)

# शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त छबिना देवीची पालखी मिरवणूक

### पाईपलाईन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिराचा वर्धापन दिन साजरा





नगर – शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त पाईपलाईन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात धार्मिक आणि भक्तिमय वातावरणात उत्सव साजरा करण्यात येत आहे. नवरात्रोत्सवातील तिसऱ्या माळेला या मंदिराची स्थापना करण्यात आली होती. या मंदिराचा वर्धापन दिनही उत्साहात साजरा करण्यात आला. श्री तुळजाभवानी माता मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान असून, देवी नवसाला पावते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे या मंदिराची ओळख 'नगरची देवी' म्हणून निर्माण झाली आहे.

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त पारंपरिक धार्मिक वातावरणात छबिना देवीची पालखी मिरवणूक काढण्यात येत आहे. मिरवणुकीदरम्यान ठिकठिकाणी भाविक पालखीचे दर्शन घेत असून, भक्तिभावाने देवीची पूजा–अर्चा करत आहेत. 'श्री तुळजाभवानी मातेचा जयजयकार' आणि देवीच्या नावाचा गजर यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला आहे. श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत असून, दर्शनासाठी भाविकांना रांगेत उभे राहावे लागत आहे. देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, पारंपरिक पद्धतीने धार्मिक विधी आणि पूजाअर्चा करण्यात येत आहे.

उत्सवाच्या पार्श्वभूमीवर देवस्थानाच्या वतीने भाविकांच्या दर्शनासाठी योग्य नियोजन करण्यात आले आहे. भाविकांना सुलभतेने दर्शन घेता यावे, यासाठी आवश्यक सोयी–सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे.

नवरात्रोत्सवामुळे श्री तुळजाभवानी माता मंदिर परिसरात मंगलमय आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

# संस्कृत भाषा ही आपली संस्कृती आहे

### श्रीकांत नांदापूरकर यांचे प्रतिपादन; मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये स्त्री शक्तीचा जागर व श्री सुक्तम्‌चे सामुदायिक पठण



हिंद सेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये विहिंपचे मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे वतीने शारदीय नवरात्रौत्सव निमित्त 'स्त्री शक्तीचा जागर' या उपक्रमा अंतर्गत श्री सुक्तम् पाठाचे सामुदायिक पठण करण्यात आले.

नगर – शारदीय नवरात्र उत्सव हा पावन पर्व आहे. या काळात स्त्री शक्तीचा जागर सर्वत्र होत असतो. प्रत्येकाच्या घरामध्ये आई, बहीण, आत्या, मावशी, काकू, आजी या नात्यांमध्ये आपला समाजातील नातेसंबंध टिकून आहेत. भारत मातेला देखील आई म्हणून संबोधले जाते. मुलींनी किंवा महिलांनी कोणतेही संकट आल्यास न डगमगता सामोरे जाणे आवश्यक आहे. नवरात्र उत्सवानिमित्त देवीची उपासना करण्यात यावी. देवी लक्ष्मीचे श्रीसूक्तम् हे संस्कृत श्लोक असून या श्लोकाच्या पठणाने मुलांची बुद्धी तीव्र होते, तसेच पाठांतर क्षमता आणि एकाग्रता वाढते. संस्कृत भाषा ही आपली संस्कृती आहे, ती प्रत्येकाने जोपासावी, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर यांनी केले.

हिंद सेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये विहिंपचे मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे वतीने शारदीय नवरात्रौत्सव निमित्त 'स्त्री शक्तीचा जागर' या उपक्रमा अंतर्गत श्री सुक्तम् पाठाचे सामुदायिक पठण करण्यात आले.

याप्रसंगी विहिंपचे मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, अरुण खिची, प्राचार्य प्रा. अनुरीता झगडे आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्राचार्य प्रा. अनुरीता झगडे म्हणाल्या, शाळा ही केवळ पुस्तकी ज्ञान देणारी संस्था नसून संस्कार केंद्र आहे. नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने आम्ही विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, स्वाभिमान आणि भारतीय संस्कृतीची जाणीव जागृत करण्याचा प्रयत्न करत आहोत. श्री सुक्तम् पठणासारख्या उपक्रमांमुळे मुलींमध्ये सकारात्मक ऊर्जा, शिस्त आणि एकाग्रता वाढते. आमच्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थिनी हीच उद्याची सक्षम स्त्री शक्ती आहे.

या कार्यक्रमासाठी हिंद सेवा मंडळाचे पदाधिकारी व शाळेचे चेअरमन जगदीश झालानी यांचे मार्गदर्शन लाभले आहे. यावेळी तुबा खान या विद्यार्थिनीने व्यंकटेश स्तोत्र हे संस्कृत श्लोक सादर केले. यावेळी तिचा सन्मान करण्यात आला. गजेंद्र सोनवणे यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## वेळ यायला हवी

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

संकलन: दिशान फिचर्स




ही आहे संत ज्ञानेश्वरांची विराणी, घनु वाजे घुणघुणा । वारा वाजे रुणुझुणा भवतारकु हा कान्हा। वेगी भेटवा का। चंदनाची चोळी। माझे सर्व अंग पोळी कान्हो वनमाळी । बेगी भेटावा का। दर्पणी पाहता। रुप न दिसे आपुले। बाप रुखमादेवीविवरे । विठ्ठले मज ऐसे केले ।।

आभाळ भरून आलंय. आतल्या आत गुदमरतोय त्याचा आवाज. म्हणून ऐकू येतोय घुण घुण असा. वारा सुटलाय, त्याचाही आवाज होतोय रुणुझुणसा माझाही उर भरुन आलाय. मनाची हुरहुर वाढतेय. तो माझा प्रियकर, कन्हय्या, लवकर भेटवा हो त्याला. नाही सहन होत हा विरह आता. विरह शमवायला वरवरचे उपचार का कामी यायला ? चंदनाची चोळी केली. ती अंगाला चटके देऊ लागली. आता एवढच करा, त्या कान्हाची व माझी लवकर भेट घडवा. कशी अवस्था झालीय गं, माझी. मी उरलेच नाही माझी। आरशात पाहिले, मी सनवत:ला हरवून बसले. तोच दिसला फक्त सावळा. रखमाईच्या वल्लभानं त्या विठ्ठलानं मला कसं ग हे करवून टाकलंय. अगदी तन्मय प्रेमाचं हे असंच अद्वैत. देह दोन, पण प्राण एक. नव्हे दुसरा उरतोच कुठे? वेळ यावी लागते ना प्रेमसाफल्याची. परीक्षाच असते ती तुमच्या निष्ठेची.

आणि असे फक्त प्रेमातच घडते? छे जीवनाच्या प्रत्येक एकनिष्ठ प्रयत्नात, उद्योगात, परिश्रमात जाणवते. काळ वेळ आली नाही, तर यश तत्काळ पदरी पडत नाही. आणि वेळ आली तर कात्रीत पकडल्या गेलेल्याही मरणही येत नाही. म्हणतातच काळ आला होता, पण वेळ आली नव्हती.

जसे वाईटाचे, तसेच भल्याचेही व्हायला वेळ यायला पाहिजे. मनाला यशाची ओढ, पण त्याच वेळी योग्य वेळेची जोड मिळाली पाहिजे. प्रयत्न आणि वेळ यांचा मेळ जमला की उद्योगाचा खेळ रंगतो. पाहा ना ही कहाणी.

एक होता राजा. त्याची मंत्र्यांशी झाली चर्चा. मंत्री म्हणाला, की पैसा आणि श्रम असले तरी अनुकूल वेळ यायला हवीच. एरवी पैसा आणि श्रम वाया जातात. राजाला ते मान्य नव्हते. त्याने एका कोळ्याला बोलावले.

त्याला खूप पैसे दिले. त्या सांगितले की, जाळं घे मोठं विकत. पकड मासे मोठाले. हो श्रीमंत कोळ्याने पैसे घेतले पाच हजार तो आनंदला. त्यातल्या शंभराचे त्याने कपडे घेतले व खाद्यपदार्थ मागवले. खाद्यपदार्थ हातात घेऊन तो घराकडे निघाला. घारीने झडप घातली. कोळयाने चपळाई केली. वाचले, पण घारीने त्याच्या डोक्यावरचे मुंडासेच उडवले व बरोबर नेले. मुंडाशात राजाने दिलेले बाकीचे पैसे होते. आता कसले जाळे आणि मासे पकडणे.

हे राजाला कळले. प्रधानाचे म्हणणे खरे ठरले. काही दिवसांनी प्रधानाने त्याला फक्त पन्नास रुपयेच दिले. ते मुठीत घेऊन तो कोळी निघाला. समुद्रकाठच्या आपल्या झोपडीजवळ आला. तोच एक श्रीमंत कोळी दारात उभा.

तो श्रीमंत कोळी म्हणाला, गड्या पन्नास रुपये हवेत अन्नाचे. मी पैसे घरी विसरलो. हे जाळे रात्री उंदरांनी थोडे कुरतडले आहे. ते नीट करवून घेतो.

कोळ्याने श्रीमंताला पैसे दिले. श्रीमंत कोळ्याने त्याला मासे पकडायला कामावर घेतले. शिवाय तुझ्या मेहनतीने पहिला मासा जो पकडला जाईल तो तुझा होईल, असे आश्वासन दिले.

कोळ्याने दुरुस्त झालेले जाळे फेकले. पहिल्यांदाच मोठा मासा जाळ्यात अडकला. तो कोळ्याचा झाला. श्रीमंत कोळयाने सायंकाळी त्या कोळ्याचे पैसे परत केले व तो मासाही दिला. घरी जाताच त्या कोळ्याने मासा कापला. आश्चर्य माशाच्या पोटात एक मोठा मौल्यवान हिरा सापडला. कोळी श्रीमंत झाला. मोठे घर बांधून राहू लागला. एकदा मुलाचा पतंग काढायला तो झाडावर चढला. पतंगाशेजारीच एक काळेकुट्ट मुंडासे अडकलेले होते. तेच हे आपले जुने मुंडासे असेल का? त्याने ते उत्सुकतेने काढले. होय, तेच हेते ते राजाने दिलेले पाच हजार त्यात सुरक्षित होते. घारीने ते झाडावर आणून टाकले. काळ अनुकूल झाला की प्रयत्न फळाला.

– किशोर गांधी

# नगरमधील कोहिनूर मॉलमध्ये १७ व १८ ऑक्टोबरला नवरात्री-दिवाळी विशेष 'हस्तकला बाजार'चे आयोजन

नगर – अहिल्यानगरमधील 'कोहिनूर मॉल'च्या वतीने 'नवरात्री दिवाळी स्पेशल हस्तकला बाजार' चे आयोजन करण्यात आले आहे. हा प्रदर्शन व विक्री सोहळा १७ आणि १८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते रात्री ९ या वेळेत कोहिनूर मॉल, प्रेमदान चौक, सावेडी, अहिल्यानगर येथे पार पडणार आहे.

येथे स्थानिक कलाकार, कारागीर आणि गृहउद्योजकांसाठी एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले जात आहे. या 'हस्तकला बाजार'मध्ये विविध क्षेत्रांतील कलाकारांना आपले कौशल्य आणि उत्पादने प्रदर्शित करण्याची संधी मिळणार आहे.

नवरात्री दिवाळी स्पेशल Hastkala Bazaar

या प्रदर्शनात हँडमेड ज्वेलरी डिझायनर्स, हस्तकला ब्रँड्स, हँडलूम आर्टिस्ट्स, आर्ट व पेंटिंग क्रिएटर्स, टेराकोटा क्ले आर्ट, एम्ब्रॉयडरी वर्क, होम डेकोर व गिफ्ट आयटम मेकर्स, डाय प्रॉडक्ट्स, रिसायकल आर्ट, कँडल्स मेकर्स, रेझिन आर्ट, आकाश कंदील, डेकोरेटिव्ह पणती, रांगोळीचे साहित्य इत्यादी उत्पादनांचे स्टॉल असणार आहेत.

उत्कृष्ट स्टॉल सादरीकरणासाठी विशेष पारितोषिक दिले जाणार आहे. स्थानिक कलाकारांनी आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी आणि ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मॉल प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# देवीची आरती करुन शांतता, समृद्धी अन् पावसासाठी प्रार्थना

### देवीच्या भक्तीतून सकारात्मक ऊर्जा मिळते : दिलीप टिपरसे



एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थान मंदिरात शहर पोलीस उपाधीक्षक दिलीप टिपरसे यांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली.

नगर – एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थान मंदिरात शहर पोलीस उपाधीक्षक दिलीप टिपरसे यांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली. यावेळी त्यांनी देवीच्या चरणी नतमस्तक होत समाजात शांतता व समृद्धी नांदावी, तसेच दुष्काळाचे सावट दूर होऊन सर्वत्र समाधानकारक पाऊस पडावा, अशी प्रार्थना केली. भक्ती, श्रद्धा आणि सकारात्मक ऊर्जेचा संदेश देणाऱ्या या धार्मिक सोहळ्याला देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित होते.

ट्रस्टच्या वतीने दरवर्षी नवरात्रोत्सव उत्साहात साजरा केला जातो. यंदाही नवरात्रोत्सवानिमित्त मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. धार्मिक कार्यक्रमांसोबतच भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठीही ट्रस्टच्या वतीने विशेष नियोजन करण्यात आले आहे.

पोलीस उपाधीक्षक दिलीप टिपरसे यांनी मंदिर परिसराला भेट देऊन नवरात्रोत्सवाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या व्यवस्थेची पाहणी केली. भाविकांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सुविधा, धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन आणि आरोग्यविषयक उपक्रमांची माहिती त्यांनी जाणून घेतली. देवस्थान ट्रस्टने श्रद्धा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर समन्वय साधत केलेल्या नियोजनाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. धार्मिक उत्सवांच्या माध्यमातून भाविकांना अध्यात्मिक समाधान मिळण्याबरोबरच सामाजिक जाणीवही जपले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी बोलताना पोलीस उपाधीक्षक दिलीप टिपरसे म्हणाले की, देवीच्या भक्तीतून सकारात्मक ऊर्जा मिळते. ही ऊर्जा माणसाला आपले कर्तव्य अधिक निष्ठेने पार पाडण्यासाठी प्रेरणा देते. नवरात्रोत्सव हा श्रद्धा, भक्ती आणि शक्तीचा उत्सव असून, या काळात पोलीस दलालाही आपले कर्तव्य बजावण्यासाठी नवी स्फूर्ती मिळते. उत्सवाच्या काळात भाविकांची सुरक्षितता राखणे, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे आणि नागरिकांना शांततेत धार्मिक कार्यक्रमांचा आनंद घेता यावा, यासाठी पोलीस दल प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. तर नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने त्यांनी भाविकांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात, श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे आणि सचिन कोतकर आदी उपस्थित होते.



कृष्णा शेटे व गायत्री खामकर यांची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल संभाजीराजे कुस्ती केंद्राच्या वतीने दोन्ही खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. (छायाचित्र – लहू दळवी)

# कृष्णा शेटे व गायत्री खामकर यांची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

### शालेय विभागीय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक; संभाजीराजे कुस्ती केंद्राच्या वतीने सत्कार

नगर – भिस्तबाग येथील संभाजीराजे कुस्ती केंद्रातील पैलवान कृष्णा शेटे आणि गायत्री खामकर यांनी शालेय विभागीय कुस्ती स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत प्रथम क्रमांक पटकाविला. दोघांचीही पंढरपूर येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली.

या यशाबद्दल संभाजीराजे कुस्ती केंद्राच्या वतीने दोन्ही खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. या वेळी पैलवान शिवाजी चव्हाण, पैलवान संदीप गायकवाड, पैलवान अजित वाघ, पैलवान युवराज चव्हाण, पैलवान आतिश ठाकूर, पैलवान यश ताकवणे, पैलवान हसन राजे, गोरख शेटे, शंभू यादव, दत्ता लष्करे यांच्यासह कुस्ती केंद्रातील खेळाडू उपस्थित होते. कृष्णा शेटे आणि गायत्री खामकर यांना संभाजीराजे कुस्ती केंद्रात पै. युवराज चव्हाण, पै. राजेंद्र कंबोज आणि पै. संकेत कुंभार यांचे कुस्तीचे मार्गदर्शन लाभले.



महापालिकेच्या केडगाव येथील प्रथम आयएसओ मानांकन प्राप्त ओंकारनगर प्राथमिक शाळेत वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

# वाचन प्रेरणा दिनानिमित्त ओंकारनगर शाळेत तरंग वाचनालय

### जागतिक हात धुवा दिन प्रात्यक्षिकासह साजरा

नगर – महापालिकेच्या केडगाव येथील प्रथम आयएसओ मानांकन प्राप्त ओंकारनगर प्राथमिक शाळेत वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी शाळेत उपलब्ध असणाऱ्या १४५० पुस्तकांपासून तरंग वाचनालय तयार करण्यात आले आहे. या वाचनालयातील विविध पुस्तके वाचून विद्यार्थ्यांनी माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांना आदरांजली वाहिली. प्रारंभी डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

सहशिक्षिका वृषाली गावडे यांनी डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवनावर आधारित माहिती विद्यार्थ्यांना दिली. त्यानंतर विद्यार्थी व शिक्षक यांनी तरंग वाचनालयातील विविध पुस्तकांचे सलग दोन तास वाचन केले.

मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी विद्यार्थ्यांना जागतिक हात धुवा दिनानिमित्त हात धुण्याच्या सप्तशतीचे प्रात्यक्षिक दाखवले. तसेच विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक करून घेतले. यावेळी विद्यार्थ्यांना स्वच्छतेच्या चांगल्या सवयींविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहशिक्षक शिवराज वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन दिल्यास त्यांच्यातून नवे शास्त्रज्ञ घडतील

### शिवप्रसाद घालमे यांचे प्रतिपादन; सारडा महाविद्यालय संशोधकांनी गजबजले; आविष्कार संशोधन स्पर्धेत ४०० विद्यार्थ्यांचा सहभाग




नगर – विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, संशोधन, कल्पकता व सर्जनशीलत वाढून त्यास चालना मिळावी या उद्देशाने पुणे विद्यापीठाने अविष्कार संशोधन स्पर्धेचे आयोजन केले आहे. विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण ज्ञान मिळवण्याची संधी अविष्कार स्पर्धा मुळे उपलब्ध होत आहे. केवळ पुस्तीकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन दिले तर त्यांचा सर्वांगीण विकास होऊन उद्याचे नवे शास्त्रज्ञ घडतील, असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे नगर उपकेंद्राचे सहाय्यक कुलसचिव शिवप्रसाद घालमे यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने पेमराज सारडा महाविद्यालयात घेण्यात आलेल्या आविष्कार संशोधन स्पर्धेच्या विभागीय फेरीचे उद्घाटन पुणे विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव शिवप्रसाद घालमे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे विद्यापीठाच्या नगर केंद्राचे जिल्हा समन्वयक आनंद पंडित होते. यावेळी हिंद सेवा मंडळाचे सचिव सुमतीलाल कोठारी, कार्याध्यक्ष अनंत देसाई, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, संचालिका प्रा.ज्योती कुलकर्णी, जगदीश झालानी, प्राचार्य डॉ.माहेश्वारी गावित, उपप्राचार्य मिलिंद देशपांडे, स्पर्धेचे समन्वयक प्रा.शैलेश निकम, सुनील सुसरे आदींसह प्राध्यापक, विविध महाविद्यालयांचे सहभागी विधार्थी, परिक्षक उपस्थित होते. या स्पर्धेत जिल्यातील महाविद्यालयांमधील सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग होऊन विविध विषयांवरील संशोधनात्मक उपकरणे सादर केली.

आनंद पंडित म्हणाले, आविष्कार संशोधन स्पर्धा विद्यार्थ्यांमधील संशोधन शक्ती वाढवत आहे. तसेच स्पर्धेतील विजेत्यांना अनेक शिष्यवृत्ती देऊन विद्यापीठ विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत आहे. उत्कृष्ट नियोजनामुळेच पुणे विद्यापीठाने विभागीय स्पर्धेसाठी सारडा महाविद्यालयास प्राधान्य दिले आहे.

सुमतीलाल कोठारी म्हणाले, सारडा महाविद्यालयात दरवर्षी आविष्कार संशोधन स्पर्धेत विद्यार्थ्यानाचा मोठा सहभाग असतो. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या प्रयात्नाना चांगले प्रोत्साहन मिळत आहे. भविष्यातील यशस्वी वाटचालीसाठी ही स्पर्धा मार्गदर्शक आहे.

अनंत देसाई म्हणाले, अविष्कार स्पर्धा नावाप्रमाणेच नाविन्याला जन्म देणारी आहे. विद्यार्थ्यांमधील संशोधकाला बाहेर काढण्यासाठी पुणे विद्यापीठ हा प्रयत्न कौतुकास्पद आहे, असे सांगून दिवाळी सुटीत शालेय विद्यार्थ्यांसाठी पुणे विद्यापीठाने असा वेगळा उपक्रम राबवावा अशी सूचना केली.

अजित बोरा यांनी सारडा महाविद्यालयाच्या प्रगतीची माहिती देऊन यासाठी संस्थेचे माजी सचिव संजय जोशी यांचे यामध्ये बहुमोल योगदान असल्याचे सांगितले. प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी केले.

स्पर्धा समन्वयक प्रा.शैलेश निकम यांनी स्वागत केले. प्रा.दया देठे यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा.स्वाती रोकडे यांनी आभार मानले.



८५ वर्षांची प्रदीर्घ परंपरा असणाऱ्या पुण्यातील कावेडिया ज्वेलर्सतर्फे अहिल्यानगरमधील हॉटेल आयरिस प्रीमियर येथे तीन दिवसीय दागिन्यांच्या प्रदर्शनाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी सौ. शितल संग्राम जगताप आदी.

# पुणे येथील 'कावेडिया ज्वेलर्सच्या' प्रदर्शनाचा अहिल्यानगरमध्ये शुभारंभ

## १८ ऑक्टोबरपर्यंत नागरिकांसाठी खुले; विविध प्रकारचे दागिने खरेदी करण्याची सुवर्णसंधी

नगर – ८५ वर्षांची प्रदीर्घ परंपरा असणाऱ्या पुण्यातील कावेडिया ज्वेलर्स तर्फे अहिल्यानगरमधील हॉटेल आयरिस प्रीमियर येथे तीन दिवसीय दागिन्यांच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन १६, १७ आणि १८ ऑक्टोबर दरम्यान नागरिकांसाठी खुले राहणार असून या प्रदर्शनाचा प्रारंभ १६ ऑक्टोबर रोजी सकाळी सौ. शीतल संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.




या प्रदर्शनाचे खास वैशिष्ट्य म्हणजे येथे विविध प्रकारच्या दागिन्यांतून पारंपरिक कलाकुसर आणि आधुनिक डिझाईन्सचा सुंदर संगम पाहायला मिळेल. नगरकरांना कावेडिया ज्वेलर्सच्या या दागिन्यांच्या प्रदर्शनामुळे पुणे व मुंबईसारख्या महानगरांच्या प्रकारे विविध दर्जेदार दागिन्यांची खरेदी करता येणार असल्याचा विश्वास यावेळी सौ. जगताप यांनी व्यक्त केला.

तुमच्या घरातील विवाहसोहळा, सण – समारंभ किंवा आयुष्यातील एखादा खास प्रसंग असो, सर्व प्रकारच्या दागिन्यांची खरेदी एकाच छताखाली करण्याची उत्तम संधी अहिल्यानगरच्या नागरिकांना यानिमित्ताने मिळणार आहे. अहिल्यानगरमधील सुवर्णप्रेमी रसिकांनी आणि ग्राहकांनी १६ ते १८ ऑक्टोबर दरम्यान हॉटेल आयरिस प्रीमियर येथे भेट देऊन कावेडिया ज्वेलर्सच्या या अप्रतिम डिझायनर कलेक्शनचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अहिल्यानगर जिल्हा जाहिरातदार संघटना व 'फेम'तर्फे बालगोपाळांना मदत करून राष्ट्रीय जाहिरात दिन साजरा

नगर – अहिल्यानगर जिल्हा जाहिरातदार संघटनेच्या वतीने जाहिरात व्यवसायवाढीसाठी प्रयत्न करून सदस्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम घेतले जातात. याबरोबरच सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. १४ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय जाहिरात दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त उत्कर्ष बालघरमधील बालगोपाळांना मिठाई व खेळाचे साहित्य देण्यात आले. समाजातील प्रत्येक घटकाने वंचितांना मदत करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे असे सांगून यापुढील काळात या संस्थेला सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे प्रतिपादन संघटनेचे अध्यक्ष गुलशन अरोरा म्हणाले.

अहिल्यानगर जिल्हा जाहिरातदार संघटना व फेडरेशन ऑफ ॲडव्हर्टायझिंग एन्त्रप्रुनर्स (फेम) यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय जाहिरात दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त उत्कर्ष बालघरमधील बालगोपाळांना मिठाई, तसेच खेळाचे साहित्य देण्यात आले. यावेळी श्री. अरोरा बोलत होते.



अहिल्यानगर जिल्हा जाहिरातदार संघटना व फेडरेशन ऑफ ॲडव्हर्टायझिंग एन्त्रप्रुनर्स (फेम) यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय जाहिरात दिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी संघटनेचे उपाध्यक्ष जयंत देशपांडे, सचिव प्रसाद मांढरे, तसेच फेमचे कार्यकारिणी सदस्य राजेंद्र म्याना, किशोर मरकड, प्रमोद गांधी, नितीन देशमुख, सुरेंद्र मुथा, प्रफुल मुथा, आणि 'उत्कर्ष'चे युवराज गुंड व सहकारी उपस्थित होते.

'फेम'चे राजेंद्र म्याना म्हणाले की, 'फेम' ही राज्यभरातील जिल्हा जाहिरात संघटनांची शिखर संस्था आहे. 'फेम'च्या वतीने राज्यभर राष्ट्रीय जाहिरात दिन जिल्हा स्तरावर विविध स्तरावर मोठ्या उत्साहात व सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. 'उत्कर्ष'मधील बालगोपाळांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य पाहून आनंद वाटला. सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या शहरातील विविध संस्थांना संस्थेच्या वतीने, तसेच दानशुरांकडून मदत मिळवून देण्याकामी प्रयत्नशील राहू, असे सांगितले.

सदस्य किशोर मरकड यांनी समायोचित भाषण करून 'उत्कर्ष'चे संचालक युवराज गुंड यांच्या कामाचे कौतुक करून बालगोपाळांशी संवाद साधत त्यांना बोलते केले.

नितीन देशमुख यांनी मुलांना मार्गदर्शन करीत पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी कानमंत्र दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेंद्र मुथा यांनी केले. सचिव प्रसाद मांढरे यांनी आभार मानले.

# आंतरशालेय स्पीड स्केटिंग स्पर्धेमध्ये अहिल्यानगरचा कार्तिक बनकर प्रथम

नगर – जिल्हा अधिकारी कार्यालय व अहमदनगर महानगरपालिका आयोजित आंतर शालेय स्पीड स्केटिंग स्पर्धेत सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या कार्तिक दिपक बनकरने प्रथम क्रमांक मिळविला त्याची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे आणि आंतर शालेय बास्केट बॉल स्पर्धेत दुसरा क्रमांक व टेबल टेनिस स्पर्धेत तिसरा क्रमांक आला.



जिल्हा अधिकारी कार्यालय व अहमदनगर महानगरपालिका आयोजित आंतरशालेय स्पीड स्केटिंग स्पर्धेत सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या कार्तिक दिपक बनकरने प्रथम क्रमांक मिळविला.

यामुळे संस्थेचे अध्यक्ष राम शेठ मेघानी, प्राचार्य गीता तांबे, मुख्याध्यापिका कांचन पापडेजा यांनी अभिनंदन केले तसेच या स्पर्धेसाठी अमोल धोपावकर सर, प्रियांका मंगलारप मॅडम, शुभम करपे सर, सचिन डोंगरे सर धोपावकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्तिक बनकर याची १७ वर्षाखालील गटात (क्वाड स्केटिंग) विभागीय स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. कार्तिक याला प्रशिक्षक शुभम करपे सर (टीम एम स्पोर्टस् अकादमी, अहिल्यानगर) यांचे मार्गदर्शन मिळाले आहे.

# तिघांना सभासदत्व द्या : सहकार मंत्र्यांचे अहमदनगर मर्चंटस बँकेला आदेश

नगर – अहमदनगर मर्चंटस को ऑप. बँकेला योगेश बडगे (रा. दहिगाव, ता. नगर) शंकर दळवी व तारा दळवी (रा. केडगाव) या तीन अर्जदारांना सभासदत्व बहाल करण्याचे आदेश सहकार मंत्र्यांनी दिले आहेत. सभासदत्व देण्याबाबत पुणे येथील सहकारी संस्था अप्पर निबंधकांनी दिलेले आदेश कायम ठेवत सहकार मंत्र्यांनी मर्चंटस बँकेचे अपील फेटाळून लावले आहे. याआधीही विविध प्रकरणात बँकेला अर्जदारांना सभासदत्व देण्याचे आदेश सहकार विभाग तसेच उच्च न्यायालयाने दिले आहेत.



राजेंद्र चोपडा

योगेश बडगे, शंकर दळवी, तारा दळवी यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून मर्चंटस बँकेच्या सभासत्वासाठी अर्ज केले होते. मात्र बँकेच्या संचालक मंडळाने मार्च २०२४ मध्ये तिघांचेही अर्ज फेटाळून लावले. याविरोधात तिघा अर्जदारांनी सहकारी संस्था अप्पर निबंधकांकडे अपील दाखल केले. त्यावर सुनावणी होऊन संबंधित अर्जदारांना सभासदत्व देण्याचे आदेश बँकेला देण्यात आले. या निकालाविरोधात बँकेच्या वतीने सहकार मंत्र्यांकडे अपील करण्यात आले. सहकार मंत्र्यांसमोर झालेल्या सुनावणीत दोन्ही बाजूंनी युक्तिवाद करण्यात आला. यानंतर सहकार मंत्र्यांनी निकाल देत सहकार निबंधकांचे आदेश कायम ठेवत बँकेचे अपील फेटाळले आणि तिघांना सभासदत्व देण्याचे आदेश दिले. २१ सप्टेंबर रोजी हा निकाल देण्यात आला. या प्रकरणात तिघा अर्जदारांच्या वतीने ॲड. नितीन गवारे यांनी बाजू मांडली.

या मुद्द्यावरून बँकेचे सभासद राजेंद्र चोपडा यांनी बँकेच्या संचालक मंडळाच्या धोरणावर टीका केली आहे. चोपडा यांनी सांगितले की, अहमदनगर मर्चंट को–ऑपरेटिव्ह बँक ही शेड्युल बँक झालेली आहे तिला महाराष्ट्र राज्य हे सगळे क्षेत्र व्यवसायासाठी सहकार खात्याकडून मंजूर झालेले आहे. महाराष्ट्र राज्यातील कुठलीही व्यक्ती या बँकेचा सहकार कायद्यानुसार नियमांचे पालन करून सभासद होऊ शकतो. वयाची १८ वर्षे पूर्ण आहे, बँकेच्या शेअर्सची जी काही रक्कम ठरलेली असेल त्या बँकेच्या पोटनियमानुसार व सहकार कायद्यानुसार त्यांनी भरली असेल आणि बँकेमध्ये खाते उघडलेले असल्यास त्या व्यक्तीला रीतसर सभासद होण्यासाठी अर्ज, पॅन कार्ड, आधार कार्ड, फोटो व दोन माणसांची ओळख सर्व कागदपत्र अर्ज पूर्ण करून दिल्यास त्या व्यक्तीला कायदेशीररित्या बँकेने सभासदत्व दिले पाहिजे अशी सहकार खात्याची कायद्यातील तरतूद आहे. बँकेच्या विरोधात अपील झाल्यानंतर सहकार आयुक्त, सहकार मंत्री, उच्च न्यायालयात दाद मागितली गेली. प्रत्येक ठिकाणी बँकेचे संचालक मंडळ बँकेच्या पैशाने वकील नेमून लाखोंचा खर्च करत आहे. दरवेळी निकाल बँकेच्या विरोधात जात असूनही संचालक मंडळ आपल्या चुकीच्या धोरणात सुधारणा करण्यास तयार नाही. हे दुर्दैव आहे. बँक विनाकारण म्हणते एक लाख रुपये कर्ज घ्या तरच आम्ही सभासदत्व देऊ. पण कायद्यात अशी कोणतीही तरतूद नाही.



गुजरातमधील अहमदाबाद येथे १२ ऑक्टोबर रोजी आयोजित ब्रिक्स पारंपरिक व देशी खेळ संमेलन २०२६ या आंतरराष्ट्रीय क्रीडा कार्यक्रमात भारतीय योगासन संघाचे संघ व्यवस्थापक म्हणून जबाबदारी उत्कृष्टरीत्या पार पाडणारे अहिल्यानगरचे उमेश झोटिंग यांचा सन्मान करण्यात आला.

# ब्रिक्स पारंपरिक खेळ संमेलनात नगरच्या उमेश झोटिंग यांचा सन्मान

नगर – गुजरातमधील अहमदाबाद येथे १२ ऑक्टोबर रोजी आयोजित ब्रिक्स पारंपरिक व देशी खेळ संमेलन २०२६ या आंतरराष्ट्रीय क्रीडा कार्यक्रमात भारतीय योगासन संघाचे संघ व्यवस्थापक म्हणून जबाबदारी उत्कृष्टरीत्या पार पाडणारे अहिल्यानगरचे उमेश झोटिंग यांचा सन्मान करण्यात आला.

या व्यासपीठावर भारताच्या पारंपरिक योगासन खेळाची ओळख जगभर पोहोचविण्यासाठी झोटिंग यांनी योगदान दिले. ब्रिक्समधील दहा देशांच्या प्रतिनिधींसमोर त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय योगासन संघातील १५ खेळाडूंनी योगासन खेळाचे आकर्षक प्रात्यक्षिक सादर केले. या प्रात्यक्षिकातून भारतीय योगपरंपरेतील शारीरिक क्षमता, लवचिकता, संतुलन, शिस्त आणि कौशल्य यांचे प्रभावी दर्शन घडले. झोटिंग यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर बजावलेल्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल श्री रामावतार मानधना चॅरिटेबल ट्रस्टचे ट्रस्टी मोहन मानधना यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना मोहन मानधना यांनी सांगितले की, ही अहिल्यानगर जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. उमेश झोटिंग सरांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर योगासन खेळासाठी केलेले कार्य कौतुकास्पद आहे. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा अहिल्यानगरमधील योगासन व मल्लखांब खेळाडूंना निश्चितच मोठा फायदा होईल.

या सत्कारप्रसंगी महावीर मल्लखांब आणि योगा ट्रेनिंग सेंटरच्या प्रशिक्षिका प्रणिता तरोटे कवडे, आप्पा लाढाणे, अक्षय पावडे, प्रवीण पाटील यांच्यासह सेंटरचे खेळाडू, पालकवर्ग उपस्थित होते.

# एमबीए–२ च्या विद्यार्थ्यांची 'ज्योतीक्रांती सहकारी बँके'स शैक्षणिक भेट

नगर – बी.पी.एच.ई.एस.च्या आय.एम.एस.सी.डी.आर. येथील व्यवस्थापन (मॅनेजमेंट) विभागाच्या वतीने एमबीए भाग–२ च्या विद्यार्थ्यांसाठी अहिल्यानगर येथील मार्केट यार्डातील ज्योतीक्रांती सहकारी बँकेत शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना बँकेच्या प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव मिळावा आणि वर्गातील अभ्यासाव्यतिरिक्त बँकिंग प्रक्रियेची सखोल माहिती व्हावी, हा या भेटीमागचा मुख्य उद्देश होता.

**उपक्रमाचा तपशील :** या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना 'गोल्ड लोन' (सुवर्ण कर्ज) प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यात कर्ज अर्जाच्या मंजुरीपासून ते तारण ठेवलेल्या सोन्याचे मूल्यांकन आणि सुरक्षित ताबा मिळवण्यापर्यंतच्या सर्व टप्प्यांचा समावेश होता. तसेच, सुवर्ण कर्जासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे, कागदपत्रांची पडताळणी आणि नोंदणी प्रक्रियेची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. सर्व कायदेशीर व बँकिंग प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तारण ठेवलेले सोने सुरक्षेच्या दृष्टीने सिक्युरिटी बॅगमध्ये कसे पॅक करून सील केले जाते, याचे प्रात्यक्षिकही विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. यामुळे सुवर्ण कर्ज प्रकरणात सुरक्षा, योग्य दस्तऐवजीकरण आणि सुरक्षित अभिरक्षा (Safe Custody) यांचे काय महत्त्व असते, हे विद्यार्थ्यांना स्पष्टपणे समजले.

हे माहितीसत्र ज्योतीक्रांती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण वरपे यांच्या मार्गदर्शनाखाली सुधीर देओळालीकर आणि कु. अनुराधा मुथा यांनी घेतले. दोन्ही मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या व प्रात्यक्षिकांसह बँकिंग प्रक्रिया समजावून सांगितली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या शंकांचे निरसन केले. या शैक्षणिक भेटीदरम्यान प्रा. साक्षी मध्यान आणि प्रा. पूनम तिवारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले




एमबीए भाग–२ च्या विद्यार्थ्यांसाठी मार्केट यार्डातील ज्योतीक्रांती सहकारी बँकेत शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

# डी.एड.च्या माजी विद्यार्थ्यांचा ४० वर्षांनंतर स्नेहमेळावा, जुन्या आठवणींना उजाळा, मैत्रीचा आनंद द्विगुणित

## भंडारदऱ्याच्या निसर्गरम्य वातावरणात १९८४–८६ च्या तुकडीतील शिक्षक पुन्हा एकत्र

नगर – युनियन अध्यापक विद्यालयात १९८४ ते १९८६ या कालावधीत डी. एड.चे शिक्षण घेतल्यानंतर राज्याच्या विविध भागांत शिक्षक म्हणून सेवा बजावलेल्या माजी विद्यार्थ्यांचा तब्बल ४० वर्षे सहा महिन्यांनंतर भंडारदरा येथे स्नेहमेळावा पार पडला. वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या या शिक्षकांनी एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला.



युनियन अध्यापक विद्यालयात १९८४ ते १९८६ या कालावधीत डी.एड.चे शिक्षण घेतल्यानंतर राज्याच्या विविध भागांत शिक्षक म्हणून सेवा बजावलेल्या माजी विद्यार्थ्यांचा भंडारदरा येथे स्नेहमेळावा पार पडला.

अहिल्यानगर येथील युनियन अध्यापक विद्यालयाच्या १९८४–८६ च्या तुकडीतील विद्यार्थी डी.एड.चे शिक्षण पूर्ण केल्यानंतर राज्याच्या विविध भागांत शिक्षक म्हणून रुजू झाले होते. त्या काळात गुणवत्तेच्या आधारे डी.एड. ला प्रवेश मिळत असल्याने राज्याच्या वेगवेगळ्या भागांतून विद्यार्थी शिक्षणासाठी आले होते. पुढे अनेकांनी आपल्या अध्यापन कार्यातून विद्यार्थ्यांना घडविण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. काही जण शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, तर काही विस्तार अधिकारी अशा विविध पदांवर कार्यरत राहिले. प्रदीर्घ शैक्षणिक सेवा बजावल्यानंतर हे सर्वजण सेवानिवृत्त झाले.

काळाच्या ओघात प्रत्येक जण आपापल्या कामात आणि संसारात व्यस्त झाला. मात्र, मोबाईल आणि संपर्काच्या माध्यमातून मित्र पुन्हा एकमेकांच्या जवळ आले. त्यातूनच स्नेहमेळाव्याची संकल्पना पुढे आली. दैनंदिन व्यापातून वेळ काढत सर्वांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला. भंडारदरा येथील वसंतसुत हॉटेलमध्ये झालेल्या या मेळाव्यात जुन्या वर्गमित्रांनी शैक्षणिक जीवनातील आठवणी, शिक्षक म्हणून केलेला प्रवास आणि आयुष्यातील सुख–दुःखाचे अनुभव एकमेकांशी मनमोकळेपणाने शेअर केले. चार दशकांनंतर पुन्हा एकत्र आल्याने जणू महाविद्यालयीन जीवनातील दिवस पुन्हा अनुभवायला मिळाले.

या मेळाव्यात सुरेंद्र हातवळणे, वसंतराव लोखंडे, तुकाराम वारकड, नामदेवराव पतंगे, सुधाकर शेटे, सुनील बोंडगे, दत्तात्रय मैड, संपत गायकर, भीमराव आंबरे, रामनाथ भालेकर, विष्णू तागड, रामराव ढाकणे, शरदराव सुद्रिक, वाल्मिक शिंदे, दिनकर पारधी, मारुती गायकवाड, शिवाजी नागरे, अशोक विटनोर, आयुब इनामदार, योसेफ मकासरे, रावसाहेब चौधरी, वैजनाथ कर्डिले, रभाजी सोनवणे, अण्णासाहेब खतोडे, शिवाजी ठुबे आणि रावसाहेब सोनवणे सहभागी झाले होते.

मेळाव्याच्या यशस्वितेसाठी सुधाकर शेटे, वसंत लोखंडे, नामदेव पतंगे, रामनाथ भालेकर यांच्यासह सहकारी मित्रपरिवाराने परिश्रम घेतले.


अंतर्राष्ट्रीय सहकारिता वर्ष 2025
सहकारी समितियाँ एक बेहतर दुनिया का निर्माण करती है

## अहिल्यानगर छावणी परिषद, अहिल्यानगर

### कोटेशन सूचना

अहिल्यानगर छावणी परिषद, अहिल्यानगर क्षेत्र व परिसरातील सर्व लोकांना या सुचनेद्वारे कळविण्यात येते कि, खालील दर्शविलेल्या बाबींचा ठेका मोहरबंद कोटेशन पद्धतीने छावणी परिषदेने देण्याचे ठरविले आहे. तरी इच्छुक ठेकेदारांनी खालील प्रमाणे कोटेशन मागवत आहे.

| अ. क्र. | तपशील | कालावधी | बयाना रक्कम | फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | छावणी क्षेत्रात फटाक्यांचे स्टॉल लावणे. १०×१० चे १२ स्टॉल | १० दिवस ०२–११–२०२६ ते ११–११–२०२६ | रु. २०००/– | २१०/– (जी.एस.टी.सह) |

छावणी परिषद लिलावाची कुठलीही बोली स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क राखून ठेवत आहे.

कोरे कोटेशन फॉर्म छावनी परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत रु. २००/– भरून दिनांक १६–१०–२०२६ ते २२–१०–२०२६ रोजी दुपारी ०३–०० वाजे पर्यंत उपलब्ध राहतील. भरलेले मोहरबंद कोटेशन फॉर्म दोन पाकीट पद्धतीने दि. २३–१०–२०२६ संध्याकाळ ५.०० वाजेपर्यंत छावणी परिषद कार्यालयातील निविदा पेटीत जमा करावेत.

सदरहू स्टॉलसाठी छावणी परिषद, अहिल्यानगर यांचेमार्फत जागा दिली जाईल. त्या शिवाय छावणी परिषद क्षेत्रातील अन्यत्र कोठेही फटाके व तत्संबधी स्फोटक वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात आल्यास पूर्वसूचना न देता सदरचा मात्र जप्त करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

क्र.अह./राजस्व/फटाकास्टॉल/२०२६–२७
छावणी परिषद कार्यालय, अहिल्यानगर
दिनांक: १५ –१०–२०२६

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
छावणी परिषद, अहिल्यानगर

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## ‘निहिलिस्ट पेंग्विन’चा ‘डेथ मार्च’



सोशल मीडियावर एका पेंग्विनचा व्हिडीओ वेगाने व्हायरल होत आहे. यामध्ये एकटाच असलेला ‘ॲडेली पेंग्विन’ आपल्या सर्वांना सोडून अंटार्क्टिकाच्या बर्फात एकटाच धावताना दिसत आहे. या पेंग्विनच्या रस्त्यात दूरवर केवळ बर्फच दिसत असून, त्याच्या आसपास कोणीही नाही. सोशल मीडियावर याला ‘निहिलिस्ट पेंग्विन’चा ‘डेथ मार्च’ म्हटले जात आहे. सहसा पेंग्विन कधीही आपल्या कळपापासून वेगळे होत नाहीत, ते नेहमी समूहानेच स्थलांतर करतात.

मात्र, पहिल्यांदाच एखादा पेंग्विन असा एकटा दिसला आहे. या व्हिडीओने अनेक सोशल मीडिया वापरकर्त्यांना भावुक केले असून, लोक याकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहत आपले विचार मांडत आहेत. पेंग्विनचा हा व्हिडीओ ‘वर्नर हर्जोग’ मधील ‘एनकाऊंटर्स एट द एंड ऑफ द वर्ल्ड’ या डॉक्युमेंटरीमधील आहे. यावर सध्या अनेक मीम्सदेखील बनत आहेत. मीम्स बनवणाऱ्यांच्या यादीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचेही नाव सामील झाले आहे. नुकताच व्हाईट हाऊसने ट्रम्प यांचा एक फोटो शेअर केला होता, ज्यामध्ये ते पेंग्विनचा हात धरून ग्रीनलँडच्या दिशेने जाताना दिसत आहेत, तर पेंग्विनच्या हातात अमेरिकेचा ध्वज आहे.

वैज्ञानिकांच्या मते, व्हिडीओमध्ये दाखवलेले पेंग्विनचे वर्तन वास्तवापेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. पेंग्विन नेहमी आपल्या समूहासोबतच राहतात. ते फक्त काही विशिष्ट परिस्थितीतच आपला समूह सोडतात. पेंग्विन तरुण असल्यास किंवा अनुभवाची कमतरता असल्यास दिशाभूल होऊन कळपापासून वेगळे होतात. अनेकदा आजारपणामुळे किंवा जखम झाल्यामुळे पेंग्विन आपल्या समूहासोबत स्थलांतर करण्यास असमर्थ ठरतात. कधीकधी पेंग्विन नवीन ठिकाणाच्या शोधात कळपापासून दुरावतात. ◆◆◆

## गंगा नदीपेक्षाही जुनी नदी



भारतीय संस्कृती आणि इतिहासात डोकावले असता, अनेकदा काही भारावणारे संदर्भ डोळ्यांसमोर येत असतात आणि थक्क करून जातात. असेच संदर्भ देशातील नद्यांबाबतही आढळतात. नद्यांची उगमस्थानापासून ते त्यांच्या उगमाच्या कथा अनेकदा विचार करायला लावतात.

देशातील अशाच एका जुन्या नदीबाबत आपण जाणून घेणार आहोत. ही आहे, भारतातील सर्वात प्राचीन नर्मदा नदी. माघ महिन्यातील शुक्ल पक्षाच्या सप्तमीला या नदीचा उगम झाल्याचे सांगितले जाते. यंदा हा दिवस २५ जानेवारी २०२६ रोजी असल्याने या नदीच्या जयंतीचा उत्सव साजरा झाला. धर्म-शास्त्रांनुसार ही नदी २५ कोटी वर्षे जुनी असून, हिमालय पर्वत आणि गंगा नदी ३ ते ५ कोटी वर्षांपूर्वीची असल्याचं म्हटले जाते. मध्य प्रदेशातील अमकंटक येथून उगम होणारी ही नदी मूळ उगमापासून १३००० कि.मी. दूरपर्यंत वाहत जात तिचा प्रवाह पुढे खंबातच्या खाडीद्वारे सागराशी एकरूप होतो. हिंदूंसाठी नर्मदा ७ पवित्र नद्यांपैकी एक असून, ही भारतातील प्राचीन नदी आहे. इतकंच नाही असेही म्हटले जाते की, नर्मदा ही गंगा नदीपेक्षा ५ पटींनी जुनी आहे. पुराणांपासून ते अगदी विज्ञानानंही नर्मदा नदीच्या आयुर्मानावर शिक्कामोर्तब केले आहे. या नदीच्या उगमाबाबत एक आख्यायिका सांगितली जाते, जिथे या नदीचा उगम भगवान शंकराच्या घामातून झाल्याचं म्हटलं जातं. आणखी एका कथेनुसार भगवान शंकरानं नर्मदा नदीतील प्रत्येक खडकाला शंकराच्या रूपात पूजण्याचे वरदान दिल्यानं या नदीतील प्रत्येक दगड हा शिवलिंगाप्रमाणं पूजनीय ठरतो, अशी धारणा आहे. नर्मदा नदीमध्ये डायनासोरची अंडीसुद्धा सापडली असून, त्याशिवाय अनेक जीवांचे अवशेष आणि सापळे इथं सापडल्यानं ही नदी कोट्यवधी वर्षांपासून अस्तित्वात असल्याचं सांगण्यात येतं. या नदीचं आणखी एक महत्त्व म्हणजे देशातील बहुतांश मुख्य नद्या पश्चिमेपासून पूर्वेला बंगालच्या उपसागराच्या दिशेनं वाहतात. मात्र, नर्मदेचा प्रवाह उलट असून, ती पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत वाहते. ◆◆◆

## हत्तीच्या हाडाची हातकुऱ्हाड



सुमारे ४८०,००० वर्षांपूर्वी सध्या ब्रिटनमध्ये राहणाऱ्या आद्य मानवांच्या वंशजांनी हत्तीच्या हाडापासून बनवलेले त्रिकोणी शस्त्र हातकुऱ्हाड धार लावण्यासाठी वापरली होती, असे एका नव्या संशोधनातून समोर आले आहे. हे शस्त्र सुमारे ४.३ बाय २.३ इंच (१०.९ बाय ५.८ सेंटिमीटर) आकाराचे असून, युरोपमध्ये आतापर्यंत सापडलेले सर्वात जुने हत्तीच्या हाडाचे साधन असल्याचे संशोधन सांगते. हे संशोधन सायन्स अडव्हान्सेस या जर्नलमध्ये प्रकाशित झाले.

या संशोधनातून उत्तर दिशेच्या हवामानात स्थायिक होत असताना आद्य मानवांच्या वंशजामध्ये असलेली उच्च पातळीची साधनसंपत्ती वापरण्याची क्षमता, जुळवून घेण्याची ताकद आणि कल्पकता स्पष्ट होते. पुराव्यानुसार पाषाणयुग (पॅलिओलिथिक काळ) भर आद्य मानव विविध उद्देशांसाठी हत्तीची हाडे आणि सुळे वापरत होते. मात्र, ‘इतक्या जुन्या किंवा त्याहून जुन्या काळातील हत्तीच्या हाडाचे साधन जगात कुठेही सापडणे अत्यंत दुर्मीळ आहे,’ असे या अभ्यासाच्या सहलेखिका आणि लंडनमधील नॅचरल हिस्ट्री म्युझियममधील पॅलिओॲंथ्रोपोलॉजिस्ट सिल्व्हिया बेलो यांनी सांगितले.

या ‘अनपेक्षित’ शोधामुळे जगातील सर्वात जुन्या हत्तीच्या हाडांच्या साधनांपैकी एक समोर आले असून, आद्य मानवांमध्ये प्रगत तांत्रिक विकास, नवीन कल्पनाशक्ती, साधनांचा कुशल वापर आणि कारागिरी असल्याचे अधोरेखित होते, असे संशोधकांनी अभ्यासात नमूद केले आहे. हे शस्त्र नेमके कोणत्या मानवसमूहाने वापरले याबाबत संशोधकांना खात्री नाही. मात्र, शस्त्राचा कालखंड आणि सापडलेले ठिकाण लक्षात घेता, प्रारंभीचे निॲंडरथल्स किंवा होमो हायडेलबर्गेन्सिस हे दोन संभाव्य मानव असू शकतात. हे शस्त्र तयार करणाऱ्या आद्य मानव पूर्वजांच्या चातुर्याचे आणि बुद्धिमत्तेचे अद्भुत दर्शन घडवते, असे बेलो म्हणाल्या. ◆◆◆

## समुद्राखाली सापडला विचित्र विषाणूंचा समूह

चीनने जगाला विविध प्रकारच्या आजारास कारणीभूत असलेल्या विषाणूंची जणू देणगीच दिली आहे. त्याच चीन समुद्रात १,७०० प्रकारच्या विषाणूंचा समूह सापडला आहे. दक्षिण चीन समुद्राच्या खोल भागात फर्स्ट इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफीसह चीनच्या समुद्री संशोधन संस्थांतील शास्त्रज्ञ ‘ड्रॅगन होल’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका विशाल पाण्याखालील सिंकहोलचा अभ्यास करत आहेत. त्याच्या आत सापडलेले जग जितके भयावह आहे, तितकेच ते आकर्षकही आहे.

हा सिंकहोल जवळपास १,००० फूट सरळ खाली उतरतो आणि तिथे अंधारलेले, ऑक्सिजनअभावी वातावरण आहे, जिथे बहुतांश सागरी जीव तग धरू शकत नाहीत. तरीसुद्धा संशोधक सांगतात की, हे टोकाचे वातावरण पूर्णपणे रिकामे नाही. या ब्ल्यू होलमधील थरांमध्ये विभागलेल्या पाण्याच्या अभ्यासातून दाट सूक्ष्मजीव समुदाय आढळले आहेत आणि त्याहूनही अधिक लक्षवेधी बाब म्हणजे डीएनए सिक्वेन्सिंगद्वारे सुमारे १,७०० प्रकारचे विषाणू (व्हायरल टाइप्स) ओळखले गेले आहेत, ज्यांपैकी अनेक सध्याच्या डेटाबेसमध्ये वर्गीकृतच नाहीत. हा शोध पृथ्वीवरील अत्यंत कठीण व लपलेल्या परिसंस्थांमध्ये जीवन आणि विषाणू कसे कार्य करतात याबद्दल नवे संकेत देत आहे.



ड्रॅगन होल हेच ब्ल्यू होलचे लोकप्रिय नाव आहे. हा दक्षिण चीन समुद्रातील एक प्रचंड सागरी सिंकहोल आहे. ब्ल्यू होल म्हणजे तीव्र उतार असलेल्या पाण्याखालील पोकळ्या, ज्या बहुतेक वेळा चुनखडीच्या भूभागात तयार होतात आणि नंतर समुद्रसपाटी वाढल्यानंतर पाण्याने भरतात. सामान्य समुद्रातील पाणी प्रवाह, वारे आणि तापमान बदलांमुळे सतत मिसळत असते; पण ड्रॅगन होलची रचना अशी आहे की, पाण्याचा प्रवाह मर्यादित राहतो. त्याच्या तीव्र भिंती आणि अरुंद मुखामुळे पृष्ठभागावरील पाणी आणि खोल थरांमधील पाण्याची देवाणघेवाण कमी होते. यामुळे सिंकहोलच्या आत तीव्र स्तरनिर्मिती होते, जणू काही वेगवेगळ्या रासायनिक गुणधर्मांचे ?‘थर?’ एकावर एक रचलेले आहेत. एकदा ऑक्सिजनचा पुरवठा थांबला की खोल पाणी अडकलेले वातावरण बनते, जिथे विलक्षण सूक्ष्मजीव दीर्घकाळ टिकू शकतात. ◆◆◆

## दक्षिण कॅलिफोर्नियाच्या आकाशात रंगांची उधळण!

दक्षिण कॅलिफोर्नियातील रहिवाशांसाठी हा आठवडा आश्चर्यकारक ठरला. ज्या भागात सहसा कधीच दिसत नाही, अशा ठिकाणी या आठवड्यात आकाशात अद्भुत ‘नॉर्दर्न लाईटस्’ किंवा ‘ऑरोरा’ पाहायला मिळाले. नॅशनल ओशनिक ॲंड ॲटमॉस्फेरिक ॲडमिनिस्ट्रेशन च्या मते, पृथ्वीवर गेल्या २३ वर्षांतील सर्वात शक्तिशाली ‘सौर विकिरण वादळ’ धडकल्यामुळे हा चमत्कार घडला आहे.



सूर्यावर झालेल्या एका शक्तिशाली ‘द-क्लास’ सौर उद्रेकामुळे चार्ज झालेल्या कणांचे ढग वेगाने पृथ्वीच्या दिशेने आले. या कणांनी पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रावर इतका प्रभाव टाकला की, एरवी केवळ उत्तर ध्रुवाजवळ दिसणारा हा प्रकाश दक्षिण कॅलिफोर्नियासारख्या कमी अक्षांशाच्या भागातही दिसू लागला. भू-चुंबकीय स्केलवर हे वादळ G4 श्रेणीत मोजले गेले, ज्याला ‘गंभीर’ मानले जाते. या पातळीवरील वादळांमुळे काही धोकेही निर्माण होतात: रेडिओ संपर्क : रेडिओ कम्युनिकेशनमध्ये व्यत्यय येऊ शकतो. सॅटेलाईट : कक्षेत फिरणाऱ्या उपग्रहांवर याचा परिणाम होऊ शकतो. पॉवर ग्रिड : जमिनीवरील वीज यंत्रणांवर ताण येऊ शकतो. अभियंते आणि अंतराळ हवामान तज्ज्ञ अशा घटनांवर बारीक लक्ष ठेवून असतात. कारण, यामुळे तंत्रज्ञानाचे नुकसान होऊ शकते. काही माध्यमांनी याचे वर्णन दशकातील सर्वात मोठे वादळ असे केले आहे; परंतु त्यात थोडा फरक आहे. मे २०२४ मधील ‘मदर्स डे’ ला आलेले वादळ ऋ५ श्रेणीतील होते, जे अलीकडील काळातील सर्वात शक्तिशाली वादळ मानले जाते. मात्र, या आठवड्यातील वादळाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील ‘रेडिएशन’ (विकिरण) घटक अत्यंत प्रबळ होता, जो गेल्या २३ वर्षांत इतक्या मोठ्या प्रमाणात दिसला नव्हता. ◆◆◆

## पृथ्वीवरील पहिला महाकाय सजीव



सुमारे ४२ कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवर अस्तित्वात असलेला आणि जमिनीवर राहणारा पहिला महाकाय जीव म्हणून ओळखला जाणारा ‘प्रोटोवॅक्सिटस्’ हा विज्ञानासाठी आजही एक मोठे कोडे ठरत आहे. शास्त्रज्ञांच्या मते, हा जीव सजीवांच्या उत्क्रांतीच्या अशा एखाद्या अज्ञात शाखेचा भाग असू शकतो, ज्याबद्दल आजवर कोणालाही माहिती नव्हती. प्रोटोवॅक्सिटसब हे जीव अत्यंत अवाढव्य होते. त्यांची उंची २६ फूट (८ मीटर) आणि रुंदी ३ फूट (१ मीटर) पर्यंत असू शकत असे. दिसायला ते फांद्या नसलेल्या झाडाच्या खोडासारखे दंडगोलाकार होते. हे जीव साधारणपणे ४२० ते ३७५ दशलक्ष वर्षांपूर्वी ‘डेव्होनियन’ कालखंडात अस्तित्वात होते.

सन १८४३ मध्ये या जीवाचा पहिला जीवाश्म सापडल्यापासून, हे नेमके काय आहेत...वनस्पती, बुरशी की शेवाळ, याबाबत शास्त्रज्ञांमध्ये मतभेद आहेत. २००७ मधील रासायनिक विश्लेषणानुसार, त्यांना ‘महाकाय प्राचीन बुरशी’ मानले गेले होते. मात्र, ‘सायन्स ॲडव्हान्सेस’ या शोधपत्रिकेत नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अभ्यासामधून एक खळबळजनक दावा समोर आला आहे. एडिनबर्ग विद्यापीठातील वरिष्ठ व्याख्याते आणि या अभ्यासाचे सह-लेखक सँडी हेदरिंग्टन यांनी सांगितले की, ‘हे जीव सजीव तर आहेत; पण आपल्याला माहीत असलेल्या स्वरूपातले नाहीत. त्यांची शरीररचना आणि रासायनिक वैशिष्ट्ये बुरशी किंवा वनस्पतींपेक्षा पूर्णपणे वेगळी आहेत. त्यामुळे ते उत्क्रांतीच्या अशा एका शाखेतील आहेत जी आता पूर्णपणे नष्ट झाली आहे.’ पृथ्वीवरील सर्व सजीवांचे वर्गीकरण प्रामुख्याने तीन डोमेनमध्ये (Bacteria, Archaea Ampu Eukarya) केले जाते. ‘युकॅर्या’ मध्ये वनस्पती, प्राणी, बुरशी आणि प्रोटोझोआ यांचा समावेश होतो. मात्र, नवीन संशोधनानुसार प्रोटोवॅक्सिटस् हे यापैकी कोणत्याही गटात बसत नाहीत, तर ते सजीवांचे एक वेगळेच साम्राज्य (घळपसवे) असू शकतात. जरी मागील संशोधनात ते कुजलेल्या पदार्थांवर जगणारे (बुरशीसारखे) आढळले असले, तरी त्यांची आंतरिक रचना कोणत्याही ज्ञात सजीवाशी जुळत नाही. स्कॉटलंडमधील ‘ऱ्हाइनी चर्ट’ भागात सापडलेल्या ‘प्रोटोवॅक्सिट्स तायटी’ या प्रजातीच्या अभ्यासातून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. विज्ञानाच्या दृष्टीने हा शोध अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. कारण, यामुळे पृथ्वीवरील जीवसृष्टीच्या सुरुवातीच्या इतिहासाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलू शकतो. ◆◆◆

## इतिहास देवमाशांच्या शिकारीचा

दक्षिण अमेरिकेतील ब्राझीलमध्ये संशोधकांना ५,००० वर्षांपूर्वीचे देवमाशांच्या (व्हेल) हाडांपासून बनवलेले भाले सापडले आहेत. या शोधामुळे हे सिद्ध झाले आहे की, केवळ उत्तर गोलार्धातील थंड प्रदेशातील लोकच नव्हे, तर ब्राझीलमधील आदिवासी गट देखील प्राचीन काळी देवमाशांची सक्रिय शिकार करत होते.

९ जानेवारी रोजी ‘नेचर कम्युनिकेशन्स’ या शोधपत्रिकेत हा अभ्यास प्रसिद्ध झाला आहे. बार्सिलोना स्वायत्त विद्यापीठाचे संशोधन संचालक आणि अभ्यासाचे सह-लेखक आंद्रे कार्लो कोलोनेस यांनी सांगितले की, हा शोध अत्यंत महत्त्वाचा आहे. मूळतः हे संशोधक दक्षिण ब्राझीलमधील ‘सांबाकी’ या स्थानिक लोकांच्या समुदायाने वापरलेल्या सागरी प्रजातींची माहिती गोळा करत होते. संशोधनादरम्यान संग्रहालयातील एका क्युरेटरने काही लाकड्यांसारख्या दिसणा ?या वस्तू बाहेर काढल्या. मात्र, त्यांची विशिष्ट रचना पाहून त्या वस्तू ‘हारपून’ किंवा शिकारीचे भाले असल्याचे शास्त्रज्ञांच्या लक्षात आले. हे भाले ‘हमपबॅक’ आणि ‘सदर्न राइट व्हेल’ या देवमाशांच्या बरगड्यांपासून बनवण्यात आली होती.

कार्बन डेटिंगनुसार, ही हत्यारे ४,७१० ते ४,९७० वर्षे जुनी आहेत. आर्क्टिक प्रदेशात सापडलेल्या पुराव्यांपेक्षा हे भाले १,००० वर्षांनी जुने असून, जगातील देवमाशांच्या सक्रिय शिकारीचा हा सर्वात जुना पुरावा मानला जात आहे. प्राचीन लोकांसाठी देवमासे हे केवळ अन्नाचे साधन नव्हते. त्यांच्यापासून मोठ्या प्रमाणात मांस (मेजवानी), उबदारपणासाठी तेल आणि अवजारे तसेच दागिने बनवण्यासाठी हाडे उपलब्ध होत असत. समुद्रकिनाऱ्यावर वाहून आलेल्या मृत देवमाशांचा वापर मानव सुमारे २०,००० वर्षांपासून करत आहे; परंतु समुद्रात जाऊन त्यांची शिकार करण्याचे पुरावे फार कमी सापडले आहेत. यापूर्वी दक्षिण कोरियात ६,००० वर्षांपूर्वी हरणांच्या हाडांनी देवमाशांची शिकार केल्याचे पुरावे मिळाले होते; परंतु थेट देवमाशांच्याच हाडांचा वापर करून त्यांची शिकार करण्याची ही पद्धत आणि काळ विज्ञानासाठी नवीन आहे. नेहमीच असा प्रश्न पडतो की, सापडलेली हाडे वाहून आलेल्या देवमाशांची आहेत की, त्यांची शिकार केली होती? संशोधकांच्या मते, या भाल्यांची रचना (ज्यात लाकडी दांडा बसवण्यासाठी पोकळी आणि अणकुचीदार टोके होती) हे स्पष्ट करते की, हे लोक सक्रियपणे समुद्रात जाऊन या महाकाय जीवांची शिकार करत असत. ◆◆◆



# धार्मिक मठा जवळच्या फुटवेअर दुकानात सुरू होती अंमलीपदार्थांची विक्री

## पोलिसांनी कारवाई करत २ किलोहून अधिक गांजा सह एकाला केले जेरबंद



धार्मिक मठा जवळच्या फुटवेअर दुकानात गांजा विक्री करणाऱ्या आरोपीला पकडल्यानंतर त्याच्या समवेत पोलिसांचे पाठ.

नगर – श्रीगोंदा शहरातील गोदडे महाराज मठाजवळील 'साईसेवा फुटवेअर' या चपलांच्या दुकानात सुरू असलेल्या गांजा या अंमली पदार्थाच्या अवैध विक्रीवर स्थानिक गुन्हे शाखा आणि श्रीगोंदा पोलिसांच्या पथकाने संयुक्त छापा टाकला आहे. या कारवाईत दुकानातून दोन किलोहून अधिक वजनाचा गांजा जप्त करण्यात आला असून, एका आरोपीला जेरबंद करण्यात आले आहे.

नगर जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिले होते. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी स.पो.नि. हरिष भोये आणि पोलीस अंमलदार बिरप्पा करमल, प्रताप देवकाते, अमोल कोतकर, बाळासाहेब गुंजाळ, सतीष भवर, भगवान धुळे यांचे एक विशेष पथक तयार केलेले आहे.हे पथक १५ ऑक्टोबर रोजी श्रीगोंदा पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत असताना, सागर अविनाश बोराडे (रा. लोहार गल्ली, श्रीगोंदा) हा गोदडे महाराज मठाजवळील त्याच्या 'साईसेवा फुटवेअर' दुकानामधून गांजाची विक्री करत असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. या माहितीची खात्री करून पथकाने श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांना लेखी अहवालाद्वारे माहिती कळवली. त्यानंतर कर्जत उपविभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या आदेशानुसार श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे स.पो.नि. कौशलराम.वाघ, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आणि महिला पोलीस शोभा कुरूळे यांनी संबंधित दुकानावर छापा टाकला. पंचासमक्ष 'साईसेवा फुटवेअर' दुकानाची पाहणी केली असता, एका कापडी पिशवीमध्ये अमली पदार्थ गांजा आढळून आला. पोलिसांनी याप्रकरणी मुख्य आरोपी सागर अविनाश बोराडे (वय ३४, रा. लोहारगल्ली, श्रीगोंदा) यास ताब्यात घेतले. आरोपीच्या दुकानातून १ लाख ८ हजार ३५० रुपये किमतीचा २ किलो १६७ ग्रॅम वजनाचा गांजा आणि ५० रुपये किमतीची कापडी पिशवी असा एकूण १ लाख ८ हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या आरोपीकडे कसून चौकशी केली असता, त्याने हा गांजा अक्षय (पूर्ण नाव माहीत नाही, रा. चौंडी, ता. जामखेड – फरार) याच्याकडून विकीसाठी आणल्याची माहिती निष्पन्न झाली. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (क), २० (ब) (ii) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गुरुवाणी – ८२

### 'कषाय'चे वमन व्हावे...



आपण पाप फक्त करतच नाही तर करवतोही. असे परिस्थिती, मनस्थिती मुळे होते. आत अशी एक रचना बनलेली असते त्यामुळे राग येतो. द्वेष निर्माण होतो. आपल्या जीवनात विरत्थुईचे बीज रूजवले पाहिजे. हे बीज वाळवंटातही अंकुरित होतेच. तीर्थंकर नाम कर्माचे बीज रोवले तर नरकगती सुद्धा मोक्षगतीत परावर्तित होते. नारकी जीव फक्त दुःख घेतो आणि दुःखच देतो. त्याला सुखाचा स्पर्शही होऊ शकत नाही. सुधर्मा स्वामी तीर्थंकरांचे परम सत्य सांगतात. तीर्थंकरांचा अहंकार, लोभ, क्रोध, मोह, माया कशी सुटली? आपल्याला अहंकार, माया, लोभ या गोष्टी कदापि सोडता येत नाही. कोणीही या तीन गोष्टी सोडण्याची कामना सुद्धा करत नाही. आपण फक्त राग सोडण्याची इच्छा व्यक्त करतो. इतर तीन कषाय आपल्याला टोचत नाही. ते सायलेंट किलर आहेत. गुरूदेवांनी १९७६ मध्ये एक गोष्ट सांगितली, 'वमन करणे'. एखादी गोष्ट खाल्लयावर आपल्याला उलटी झाली तर परत ती गोष्ट आपण खात नाही. परमात्म्याने क्रोधाची उलटी केली. क्रोध हा आतील दोष आहे. आतील दोषांसाठी इतरांना किंवा परिस्थितीला दोष देणे चुकीचे आहे. लोभ फक्त पैशाचा नसतो इतर अनेक गोष्टींचा असतो. मनाविरुद्ध गोष्ट झाली की व्यक्ती असहिष्णू होते, त्याला राग येतो. ज्या गोष्टीचा तुम्ही अहंकार करता ती गोष्ट तुम्हाला पुढच्या जन्मी मिळत नाही. तुम्ही खोटेपणा करून जगाच्या नजरेत लपू शकाल पण तीर्थंकरांच्या नजरेतून लपू शकत नाही. आपल्याला वाटते तीर्थंकरांना कळले तर कळले ते काही बोलत नाहीत. आपण परमात्म्याला घाबरत नाही, आपल्याला जगाची भीती वाटते. तीर्थंकरांनी शेवटचा अहंकार प्रिय मित्र चक्रवर्तीच्या मोहात केला आणि लगेच वमनही केले. यानंतरही तीर्थंकरांमध्ये क्रोध, अहंकाराची भावना निर्माण झाली पण या भावनेची त्यांनी कृती केली नाही. इंद्रभूती गौतमकडे ज्ञान आहे पण भावना नाही. ज्ञानाने भक्ती होत नाही, भावना असेल तरच भक्ती होते. इंद्रभूती गौतमकडे सुधर्मा स्वामींकडे असलेली अनुभूती नाही. एखादे फूल कवीकडे दिले तर तो त्यावर सुंदर कविता करेल. तेच फूल शास्त्रज्ञाकडे दिले तर तो त्याचे पोस्ट मार्टम करून त्यातील सगळ्या घटकांचे शास्त्रशुद्ध विश्लेषण करून सांगेल. ज्यादिवशी तुम्हाला तुमच्यातील कषायची मळमळ होईल तेंव्हा त्याची उलटीही होईल. उलटी झाली तर पाप करणे आणि करवणेही बंद होईल.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही विद्यमान मालक **राहुल अंबादास पवार रा. भगतवाडी, सुकापुर, न्यु पनवेल** यांचे मालकी वहीवाटीची आहे सदर प्लॉट मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या प्लॉट मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला असून आमच्या आशिलाकडून विद्यमान मालक यांनी विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर प्लॉट मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकत बाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर प्लॉट मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-** डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे बोल्हेगांव येथील सर्व्हे नं. ६९/२ मधील प्लॉट नं. २११ याचे एकुण क्षेत्रफळ १८०.०० चौ. मी. ही संपूर्ण खुली प्लॉट मिळकत.**

**यांसी चतुःसिमा :-**

पुर्व :- ९.०० मी रुंदीचा रस्ता, दक्षिण :- प्लॉट नंबर २१२,
पश्चिम :- प्लॉट नंबर २०६ उत्तर प्लॉट नं. २१०

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

अहिल्यानगर दिनांक :- १६/१०/२०२६

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
ऑफिस- गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३



महिलेला लुटणारे आरोपी मुद्देमालासह जेरबंद केल्यावर त्यांच्या समवेत तोफखाना पोलिसांचे पथक.

# महिलेचा गळा दाबून दागिने चोरणारे संशयित आरोपी जेरबंद

नगर – बोल्हेगाव येथील भोरमळा परिसरात घरात एकटी असलेल्या महिलेचा गळा दाबून आणि चाकूचा धाक दाखवून भरदिवसा बळजबरीने चोरी करणाऱ्या तिघांना तोफखाना पोलिसांनी जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली कार, २७ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि १६ हजार रूपयांची रोकड असा एकूण ८ लाख ७० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. परिसरातील शंभरहून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासून पोलिसांनी या गुन्ह्याचा छडा लावला.

सुनीता कैलास तुपेरे (वय ५४) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. ९ ऑक्टोबर रोजी दुपारी दोनच्या सुमारास त्या आपल्या घरात झोपल्या असताना चोरट्यांनी गळा दाबून व चाकूचा धाक दाखवून १ लाख ३४ हजार रूपयांचा मुद्देमाल चोरून नेला होता. या घटनेनंतर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने दोन पथके तयार केली. आरोपींचा शोध घेण्यासाठी घटनास्थळाच्या परिसरातील तसेच अन्य ठिकाणचे शंभरहून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. त्याचबरोबर गोपनीय माहिती आणि मोबाईलसंदर्भातील माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित केली. या तपासातून चोरीमध्ये सहभागी असलेल्या तिघांची ओळख निष्पन्न झाली. या प्रकरणात मनोज गोरख मांजरे (वय २७, रा. गुंडेवस्ती, मातापूर, ता. श्रीरामपूर; सध्या श्रीकृष्णनगर, शिवाजीनगर, कल्याण रोड, अहिल्यानगर), उमेश दिलीप गायकवाड (वय २२, मूळ रा. दिल्ली नाका, कुरण रोड, आंब्रमळा, संगमनेर) आणि पवन ज्ञानेश्वर कुन्हाडे (वय २७, रा. सप्तश्रृंगी मंदिराजवळ, शिरजगाव लौकी, ता. येवला, जि. नाशिक) यांना पोलिसांनी जेरबंद केले.

ही कारवाई पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली, उपनिरीक्षक प्रवीण पाटील, अंमलदार अब्दुलकादर इनामदार, अनिल रोकडे, बाळासाहेब भापसे, अमोल गाडे, भागवत बांगर, कपील गायकवाड, सतीष शिंदे, राहुल गुंड आणि अरूण सांगळे यांच्या पथकाने केली.

# साईबन परिसरात चाकूच्या धाकाने तरुणाला लुटणारा आरोपी जेरबंद



साईबन परिसरात चाकूच्या धाकाने तरुणाला लुटणारा आरोपी जेरबंद केल्यानंतर त्याच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

नगर – साईबन परिसरात मैत्रिणीसोबत बसलेल्या युवकाला चाकूचा धाक दाखवून मारहाण करत जबरी चोरी करणाऱ्या संशयित आरोपीला एमआयडीसी पोलिसांनी जेरबंद केले आहे. अक्षय भीमराव मोरे (वय २४, मूळ रा. सिंधफना वडळी, ता. शिरूर कासार, जि. बीड, हल्ली रा. विळद, ता. अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी, चाकू तसेच चोरीस गेलेला मोबाईल, रोख रक्कम आणि पाकीट असा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

ही घटना २७ सप्टेंबर रोजी रात्री घडली होती. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सपोनि हेमंत थोरात यांनी गुन्हे उघडकीस आणण्यासाठी विशेष पथक स्थापन केले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज संकलित करून त्याचे बारकाईने विश्लेषण करण्यात आले आणि तांत्रिक विश्लेषकाच्या आधारे समन्वय साधून तपास सुरू करण्यात आला.

पोलिसांनी केलेल्या सखोल तपासात हा गुन्हा अक्षय भिमराव मोरे (वय २४, मूळ रा. सिंधफणा वदळी, ता. शिरूर कासार, जि. बीड, हल्ली रा. विळद, ता. जि. अहिल्यानगर) याने केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तातडीने सापळा रचून या तरुणास ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल, चाकू तसेच चोरीस गेलेला मोबाईल, रोख रक्कम आणि पाकीट असा सर्व मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई सपोनि हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनखाली पोलीस उपनिरीक्षक अजय कोटे, स.फौ. राकेश खेडकर, पो.हे.कॉ. शलेश रोहोकल, पोकॉ.राजु सुद्रीक, दिपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, राजेश राठोड, राहुल गुंडू आणि अरुण सांगळे यांनी केली आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेले मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरलेला असून, सदर मिळकत निर्वेध निजोखमी व बोजाविरहित आहे विद्यमान मालकाचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यानी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**हि नोटीस प्रसिद्धीस दिली. ता. १६/१०/२०२६**
**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**
**मिळकत वर्णन** – जिल्हा अहिल्यानगर, पोट तुकडी व तालुका नगर पैकी महानगरपालिका हद्दीतील मौजे सावेडी येथील खालील वर्णनाची मिळकत

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ. मी. | चतुःसीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १०४/अ | १३२ ब | १००.०० हा संपुर्ण प्लॉट | प्लॉट नंबर १३२ अ | ६.०० मीटर रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर १३३ अ | भारत सरकारची मिळकत |
| १०४/अ१ | १३२अ | १००.०० हा संपुर्ण प्लॉट | प्लॉट नंबर १३१ ब | ६.०० मीटर रुंदीचा रस्ता | प्लॉट नं. १३२ ब | भारत सरकारची मिळकत |

**विद्यमान मालकांचे नाव**
**डॉ. होजेफा आशिक हुसेन बोहरी**
रा. विराज कॉलनी, तारकपूर, अहिल्यानगर

**ॲड. आर. टी. शर्मा**
**ॲड. अंकिता अनिल शर्मा (पगारिया)**
पत्ता- ऑफीस नं. १४,१७ पहिला मजला
श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर, मो. ९४२२२२०८४५



शहर परिसरात मोटारसायकल चोरणारे दोन सराईत आरोपींना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

# शहर परिसरात मोटारसायकल चोरणारे दोन सराईत पकडले

## तीन मोटारसायकलसह १ लाख ५५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

नगर – अहिल्यानगर शहरातील मार्केट यार्ड आणि झुडिओ मॉल परिसर यांसारख्या गर्दीच्या ठिकाणांहून मोटारसायकल चोरणाऱ्या दोन सराईत चोरांना कोतवाली पोलिसांनी जेरबंद केले आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून विविध कंपन्यांच्या तीन मोटारसायकल जप्त केल्या असून, एकूण १ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ६ ऑक्टोबर रोजी मार्केट यार्डमधील त्रिमुखे हॉस्पिटलसमोरून सुझुकी कंपनीची ॲक्सेस मोपेड चोरीला गेल्याची फिर्याद वैभव यशवंत साळवे यांनी दिली होती. तसेच १२ ऑक्टोबर रोजी नगर कॉलेज शेजारील झुडिओ मॉलच्या पार्किंगमधून होंडा शाईन मोटारसायकल चोरीला गेल्याची फिर्याद संपत मिराजी मांजरी यांनी दिली होती. या दोन्ही गुन्ह्यांच्या तपासासाठी कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक विशाल चिटणीस व पथकाने सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषकाच्या आधारे शोध मोहीम हाती घेतली होती.

तपास करत असताना रोजी पोलिसांनी संदीप शिवाजी घायमुक्ते (वय ३९, रा. वाकोडी रोड, अहिल्यानगर) याला विनानंबरच्या सुझुकी ॲक्सेस गाडीसह ताब्यात घेतले. चौकशी केली असता त्याने ती गाडी मार्केट यार्ड परिसरातून चोरल्याची कबुली दिली. तसेच १४ ऑक्टोबर २०२६ रोजी गस्त घालत असताना पथकाने सचिन भाऊसाहेब तेलोरे (वय ३६, रा. वाळकी, ता. नगर) यास मार्केट यार्ड परिसरातून संशयितरित्या फिरताना पकडले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने झुडिओ मॉलजवळून होंडा शाईन गाडी आणि इतर ठिकाणाहून एक विनानंबरची स्प्लेंडर प्रो मोटारसायकल चोरल्याची व ती लपवून ठेवल्याची माहिती दिली.

पोलिसांनी दोन्ही आरोपींकडून सुझुकी ॲक्सेस, होंडा शाईन आणि हिरो स्प्लेंडर प्रो अशा एकूण तीन मोटारसायकल जप्त केल्या आहेत. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवाली पोलीस ठाण्याच्या पथकाने केली आहे.






## जाहीर नोटीस

नागोरी मुस्लिम मिसगर जमाअत ट्रस्ट, रजि. नं. एफ -१७ अहिल्यानगर या न्यासाच्या सर्व मिळकंती मधील भाडेकरुंना कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेली ट्रस्टच्या मिळकतीची जागा, इमारत व दुकानाचे भाडे नागोरी मुस्लिम मिसगर जमाअत ट्रस्टची अधिकृत व नोंदणीकृत १२४८/४९, मिसगर लायब्ररी, मौलाना आझाद रोड, बेलदार गल्ली, अहिल्यानगर येथील कार्यालयात प्रत्यक्ष येवुन आपले थकीत व चालु भाडे यथावकाश जमा करुन रितसर भाडे जमा केल्याची पोच पावती घ्यावी. विहीत मुदतीत आपण आपल्या अधिनस्त असलेल्या न्यासाच्या मिळकतीचे भाडे विहित मुदतीत न भरल्यास आपणा विरुध्द कडक कायदेशीर कारवाही करण्यात येईल. तथा ट्रस्टशी केलेला भाडे करारनामा रद्द करुन नियमानुसार ताबा देण्यात येईल. तसेच युनुस सुलतान तांबटकर, इम्रान शफी अहमद शेख व इतर याचा बदल अर्ज क्र. १४५७/२२ ही मा. धर्मादाय उपायुक्त, सार्वजनीक न्यासा नोंदणी कार्यालय, अहिल्यानगर यांनी दि. १४/१०/२०२५ रोजीच्या आदेशान्वये फेटाळला आहे. त्याचप्रमाणे युनूस सुलतान तांबटकर याचा नागोरी मुस्लिम मिसगर जमाअत ट्रस्टवर ५ वर्ष विश्वस्त म्हणून नियुक्त करण्याचा महाराष्ट्र सार्वजनिक संस्था कायदा १९५० मधील कलम ४७ अन्वये दाखल केलेला अर्ज ६०/२०१६ हा सुध्दा दि. ०६/०८/२०२६ रोजीच्या आदेशान्वये मा. सहधर्मादाय आयुवत, पुणे विभाग पुणे यांनी रद्द केला आहे. तरी युनुस सुलतान तांबटकर, इम्रान शफी अहमद शेख व इतर लबाड इसमांना भाडे देवु नये आणि त्यांचेकडुन भाडे भरल्याचे चुकीच्या व खोटया पावत्या घेऊ नये. तसेच त्यांचेसोबत कोणत्याही प्रकारचे भाडेकरार व आर्थिक व्यवहार व तत्सम पद्धतीचे संदर्भातील कोणतेही पत्र व्यवहार अथवा करारनामा करु नये.

तसेच या नोटीसीद्वारे तमाम लोकांना आणि नागोरी मुस्लिम मिसगर जमाअतच्या लोकांना व सभासदांना सुचित करण्यात येते की, युनूस सुलतान तांबटकर, इम्रान शफी अहमद शेख आणि त्याचे गुंड प्रवृत्तीचे साथीदार यांच्या कोणत्याही आश्वासनांना बळी पडु नये. नागोरी मुस्लिम मिसगर जमाअत ट्रस्टची लालटाकी, तेलीखुंट, शहाजी रोड, गंज बाजार (बादशाह मस्जिद जवळ), गांधी मैदान (गुलामअली मस्जिद जवळ) आणि रेल्वे स्टेशन येथे असलेली मिळकतीचे व्यवहार व करार आणि हस्तांतरण करून घेऊ नये. अन्यथा ट्रस्टचे भाडेकरू असणारी व इतर कोणत्याही व्यक्तीला सदर ट्रस्टच्या मालकीच्या जागेमध्ये त्याच्या नावे भाडेपट्टा पावती नसल्यास सदर जागेवरून त्वरीत काढून सदरची जागा ताब्यात घेण्यात येईल. बेकायदेशीर भाडेकरूकडून व्यवसायाकरीता तसेच ट्रस्टने मिळकतीची जागा, इमारत व दुकान भाड्याने दिली आहे. अशा भाडेकरून सोडून इतर कोणी ही ट्रस्टच्या मिळकतीचा गैरवापर ट्रस्टच्या परवानगी शिवाय करताना दिसून आल्यास त्यांना दिलेला भाडेकरारनामा रद्द करून ट्रस्टमार्फत मिळकतीवर टाळा लावून बंद करून कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. याची भाडेकरूंनी नोंद घ्यावी.

दिनांक १६/१०/२०२६, अहिल्यानगर

**रेहान शफी काझी**
जनरल सेक्रेटरी

**इनामउल्ला जिक्रीया खान**
सेक्रेटरी मिसगर एज्युकेशन बोर्ड

**वाजीद जावेद खान**
खजिनदार

**इफतेखार अकिल अहमद खान**
विश्वस्त

**नागोरी मुस्लिम मिसगर जमाअत ट्रस्ट, अहिल्यानगर**

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडन विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही व सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे, पतसंस्थेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही. असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बॅक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता.१६/१०/२०२६.
परिशिष्ट मिळकतीचे वर्णन
जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी व तालुका अहिल्यानगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे भिस्तबाग येथील खालील वर्णनाचा बिगरशेती प्लॉट –
सर्व्हे नं.८/१पै मधील खालील वर्णनाचा बिगरशेती प्लॉट –

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ. मी. | यासी चतुःसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| ३६ | १९७.३१ | ओपन स्पेस | प्लॉट नं. ३७ | ९.०० मीटर रुंदीचा रस्ता | प्लॉट नं. ३४ व ३५ |

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक**
**१. गणेश बबनराव आगळे, २. महेश बबनराव आगळे,** दोघे रा. गोकुळ नगर, भिस्तबाग, अहिल्यानगर

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :- ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहिल्यानगर.
मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली शेत मिळकत ही विद्यमान मालक **सुनिता बाबासाहेब मोकाशी, हरिचंद्र बाबासाहेब मोकाशी, सचिन बाबासाहेब मोकाशी सर्व रा. भिस्तबाग, ता. जि. अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी आमचे अशिलाशी व्यवहाराची बोलणी केली असून, विसार म्हणून रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदीखत करुन देण्याचे ठरवले आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :- ।**
डि।। अहिल्यानगर सब डि।। व ता. नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे भिस्तबाग येथील सर्व्हे नं. १४/१ याचे क्षेत्र ०हे. ३४आर. + पो. ख. ०हे. ०१आर. असे एकुण क्षेत्र ०हे. ३५आर. हे संपुर्ण क्षेत्र.**

**यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणे :-**
पुर्वेस – सर्व्हे नं. १४/२,
दक्षिणेस – सर्व्हे नं १४/१ब,व सर्व्हे नं. १४/४,
पश्चिमेस – सर्व्हे नं. १३/४, उत्तरेस – १८.०० मी. डी पी रस्ता,
येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

अहिल्यानगर दिनांक – १६/१०/२०२६

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
ऑफिस- गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

**पाहिजेत**
कंस्ट्रक्शन कंपनीसाठी
**ऑफिस हेल्पर पाहिजे**
पाईपलाईन, सावेडी
अहिल्यानगर
**9325186107**

**भाड्याने देणे**
**2BHK**
लक्झरीयस रो हाऊस
२ प्रशस्त बेडरूम, मोठा हॉल, मॉड्युलर किचन, पार्किंगची सुविधा, सुरक्षित व शांत परिसर
**9021015492**

**पाहिजेत**
पोळ्या/भाकरी करण्यासाठी
महिला : जागा २
**कृष्णेश्वर**
पोळी, भाजी पार्सल पॉईंट
स्वादिष्ट, रुचकर घरची चव..
**9270703637**
चितळेरोड, अहिल्यानगर

**प्लॉट विकणे**
नगर-कल्याण रोड शंकरनगर, महावीर कॉलेजजवळ
कलेक्टर NA, कॉर्नर प्लॉट, १२ मी. ९ मी. रोड लगत सलग ४ प्लॉट क्षेत्र ४.५ गुंठे विकणे आहे.
**9421439045**

सावेडी येथील नामांकित शोरूमसाठी
**त्वरित पाहिजेत**
सेल्समन/सेल्सगर्ल - १०
१ ते २ वर्षांचा अनुभव
कॅशिअर - ०४
(आकर्षक पगार) - अर्जासह समक्ष भेटा -
Franchise by - DB VENTURES One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD.
Address : Opp. Gold's Gym, TV Center, Savedi Road, A.Nagar
**7887395983**

**भाड्याने देणे**
तीन मजली ईमारत सुस्थितीतील फर्निचरसहित भाड्याने देणे आहे.
न्यू पटेल शेजारी, मोचीगल्ली, कापडबाजार, अहिल्यानगर
**9657544527**










॥ एक ओंकार वाहेगुरु जी की फतह ॥
जम्मणु मरणा हुकमु है भाणै आवै जाइ ॥



अत्यंत दुःखद वातावरणात आम्ही सूचित करू इच्छितो की, आमचे आदरणीय
**श्री गुलशन भिखमदास कंत्रोड**
यांचे स्वर्गवास झाले आहे

त्यांच्या आत्म्याच्या शांतीसाठी उठावणा/अंतिम अरदास खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आली आहे.

**उठावणा**
शनिवार दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२.०० ते १.०० वाजता
स्थळ: गुरुद्वारा साहिब भाई दयासिंह, गोविंदपुरा, अहिल्यानगर

: शोकाकुल :
कंत्रोड, कुमार, खंडूजा, पुरी आणि आहुजा परिवार
राजेंद्र कंत्रोड (9404755644) | अमिता कंत्रोड (9860708091) | अंशु कंत्रोड (7020721033)






**॥ दशक्रिया विधी ॥**
शनिवार दि.१७/१०/२०२६ रोजी सकाळी ८ वा.
स्थळ : शुक्लेश्वर मंदिराजवळ, भिंगार अमरधाम, अहिल्यानगर
*आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!*
कै.बाळासाहेब रामचंद्र बेरड
स्व. दि. ०८/१०/२०२६
* दुःखांकित *
**समस्त बेरड परिवार**
**नातेवाईक व आप्तेष्ट**

॥ एक ओंकार वाहेगुरु जी की फतह ॥
जम्मणु मरणा हुकमु है भाणै आवै जाइ ॥



भावपूर्ण
**श्रध्दांजली**
सेवा, स्पष्टवक्ता ज्यांची ओळख...
स्व.श्री.
**गुलशन भिखमदास कंत्रोड**
एक सेवाधारी...
एक मार्गदर्शक...

समाजासाठी जगणाऱ्या आणि आपल्या अमूल्य सेवेमुळे हजारो लोकांच्या जीवनात आशा, आधार, आणि आनंद दिला..
आपकी मधुर स्मृति, स्नेह, आदर्श, मार्गदर्शन, सेवाभाव आशीर्वाद हमारे लिए सदैव प्रेरणादायक रहेंगे..



घर घर लंगर सेवा | पंजाब पूरग्रस्तांची मदत सेवा | विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप
नित्य अन्न सेवा उपक्रम | धार्मिक आणि सामाजिक स्नेहसंबंध | विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

काही लोक स्वतःसाठी जगतात आणि काही लोक दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू आणण्यासाठी जगतात...
**स्व. श्री. गुलशन भिखमदास कंत्रोड हे असेच एक व्यक्तिमत्त्व होते...**
वाहेगुरुजी त्यांना आपल्या चरणी स्थान देवो हीच प्रार्थना..!

उठावणा — शनिवार दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२.०० ते १.०० वाजता
स्थळ: गुरुद्वारा साहिब भाई दयासिंह, गोविंदपुरा, अहिल्यानगर
त्यांच्या सेवाकार्याच्या स्मृती सदैव प्रेरणा देत राहतील..

: शोकाकुल :

| | | | |
|---|---|---|---|
| जनक आहुजा | अंकित भुतानी | सुनील छाजेड | राजु जग्गी |
| सतीश गंभीर | दामोदर माखीजा | करण धुप्पड | किशोर रंगलानी |
| राजेंद्र कंत्रोड | मनोज मदान | दलजित वधवा | प्रणीत धुप्पड |
| मुन्नाशेठ जग्गी | अर्जुन मदान | डॉ. संजय असनानी | गुलशन कंत्रोड |
| हरजितसिंग वधवा | प्रशांत मुनोत | किशोर मुनोत | राजा नारंग |
| सुनील थोरात | विपुल शाह | अभिमन्यू नय्यर | अजय पंजाबी |
| प्रणित धुप्पड | कबीर धुप्पड | सोमनाथ चितामणी | राहुल बजाज |

घर घर लंगर सेवा, गुरु अर्जुन देव सामाजिक प्रतिष्ठान आणि समस्त समाज बांधव.

**लोकेश मार्केटिंग**
**9766045549**
खास नवरात्रीसाठी
फराळी पदार्थांची ऑर्डर
रुचकर ३६ प्रकार = २४+१२
**लक्ष्मण एजन्सीज**
**9890963100**

**भावपूर्ण श्रध्दांजली**
मायेची गेली सावली! करुणेचा हरवला सागर !!
उरली नाही साथ आम्हाला! आठवण येते क्षणाक्षणाला !!



**स्व. वसंतराव सिताराम बोरुडे**
**-पाचवे पुण्यस्मरण-**

-दुःखांकीत-
श्रीमती हिराबाई वसंतराव बोरुडे
श्री. अनिल वसंतराव बोरुडे श्री. संदीप वसंतराव बोरुडे
सौ. विद्या अरुण हजारे
**समस्त बोरुडे परिवार**